# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक **VISHWA PANTHASTHA**

वर्ष : पहिले । अंक : तिसरा । ऑक्टोबर २०१६ (मासिक) । मूल्य : ₹100 । AED 10 । US$ 2 www.panthastha.com



## पहिल्या आंतरराष्ट्रीय वाचक मेळाव्याचे यशस्वी आयोजन



केल्याने देशाटन

## डेस्टिनेशन नायजेरिया

'विश्व पांथस्थ'चे

## दिमाखात प्रकाशन

# या... सहभागी व्हा!
# 'विश्व पांथस्थ' तुमचेच आहे!

'विश्व पांथस्थ'मध्ये तुम्ही सहभागी होऊ शकता.

तुम्ही युएई, ओमान, कतार, बहरीन, सौदी, कुवेत, कॅनडा, जपान, अमेरिका, युरोप, रशिया, आफ्रिका किंवा भारतात कुठेही राहत असाल तर 'विश्व पांथस्थ'मध्ये लिखाण करू शकता, जाहिरात देऊ शकता किंवा तुमच्या शहरात 'विश्व पांथस्थ'चा संपर्क म्हणून काम करू शकता. जाहिराती व वार्षिक वर्गणी जमा करू शकता.

'विश्व पांथस्थ'मध्ये कोणत्या विषयावर लिहावे, याबद्दल विचारणा होत आहे म्हणून काही सूचना -

अनिवासी भारतीयांची, विशेषतः आखाती मराठी भारतीयांची गरज म्हणजे प्रथम आखातात चांगली नोकरी शोधणे किंवा असलेली नोकरी बदलून दुसरी चांगली नोकरी बघणे, आखातात व्यवसाय-धंदा करण्यासाठी माहिती व मार्गदर्शन मिळविणे, गावाकडे लक्ष देणे व घर घेणे, मुलांचे शिक्षण, सुट्टीत पर्यटन, आरोग्यविषयक सोयीसुविधा व सल्ला, डॉक्टरांची माहिती, करमणुकीचे व सांस्कृतिक कार्यक्रम यांविषयी माहिती, सामाजिक उपक्रमांविषयी माहिती व त्यात सामील होण्याची संधी, या सर्व विषयांवर तुम्ही लिहू शकता. किंबहुना तुम्हीच लिहावे, ही अपेक्षा.

'विश्व पांथस्थ' हजारो वाचकांपर्यंत पोहोचणार आहे. तेव्हा ही संधी साधून तुम्ही तुमच्या व्यवसायाची, धंद्याची, उपक्रमाची, प्रॉडक्ट्स, सर्व्हिसेस यांची माहिती सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी छानशी जाहिरात देऊ शकता. जाहिरात तयार नसेल, तर आम्ही ती तयार (डिझाईन) करण्यास मदत करू. तुमच्या व्यवसायाची जाहिरात प्रथम तुम्हीच केली पाहिजे. जे दिसते ते खपते, हे लक्षात ठेवा.

आपल्या आसपास असलेल्या उद्योगांची व उद्योजकांची माहिती द्या. उद्योजकांनीदेखील स्वतःहून पुढाकार घेऊन आपल्या उद्योगाची माहिती द्यावी (मुलाखत चालेल). आखातात आहात, येण्याची इच्छा आहे, तेव्हा नेटवर्किंग करो, धंदेकी कुछ बात करो, कुछ पैसा जोडो!

परदेशात राहणाऱ्या भारतीयांची अजून एक समस्या म्हणजे त्यांना आपल्या मुलांसाठी किंवा मुलींसाठी योग्य स्थळ शोधण्यात अडचण येते. माहितीच मिळत नाही. यावर उपाय एकच. विवाहेच्छू मुला-मुलींची माहिती द्या, त्यासाठी एक विशेष विभाग 'विश्व पांथस्थ' मासिकात असेल.

तुम्हाला नोकरी हवी असेल किंवा असलेली नोकरी बदलायची असेल, तरी 'विश्व पांथस्थ'मध्ये छोटी जाहिरात द्या. तुमच्या कंपनीत तुम्हाला योग्य उमेदवार नोकरीसाठी हवा असेल, तरी छोटी जाहिरात द्या.

कविता, मराठी गझलही जरूर पाठवा.

तुम्ही ज्या ठिकाणी राहत आहात, त्याच्या आसपासची प्रेक्षणीय स्थळे, सुट्टीसाठी कोठे जावे याबद्दल माहितीबरोबर सूचना, लेख तसेच फोटो पाठवा.

मुलांसाठी काही चांगले कोर्सेस, मुलांसाठी काही साहित्य, लिखाण पाठवा.

पैशाचे नियोजन, कोठे वाचवावे, कोठे खर्च करावे, यावर लिहा.

भारतातील सीएंनी (उअ) जरूर संपर्क साधावा.

'एनआरआय'साठी (विशेषतः आखातातील मराठी माणसांसाठी) काही विशेष सेवा, सूचना असतील तर त्यावर लिहावे. जाहिरात दिली तरी चालेल.

विविध बांधकाम व्यावसायिकांच्या (बिल्डर्स) गृहयोजना सुरू आहेत. त्यांनी 'विश्व पांथस्थ'मध्ये जाहिरात व लेख दिला, तर उत्तम.

भारतात किंवा परदेशांत भारतीयांसाठी असलेल्या राहण्याच्या सोयी (बेड व ब्रेकफास्ट), पेईंग गेस्ट याबद्दल माहिती (जाहिरात) द्या. विविध मराठी ग्रुप्स आहेत, त्यांनी आपल्या ग्रुपसंबंधी माहिती द्यावी, उपक्रमांची माहिती द्यावी.

आपल्याला किंवा आपल्या ओळखीत कोणाला काही पुरस्कार मिळाला असेल किंवा काही चांगले यश मिळाले असेल, तर त्याबद्दल लिहा. तुम्हाला आलेला चांगला किंवा वाईट अनुभव सर्वांबरोबर शेअर करा, त्याबद्दल लिहा.

तुमच्या आसपास एखादा चांगला सामाजिक उपक्रम सुरू असेल, त्याबद्दल व त्यासाठी मदतीची गरज असेल, तर त्याबद्दल लिहा.

'विश्व पांथस्थ' मासिकाचे वितरण संपूर्ण जगभर करण्याचा प्रयत्न आहे, आपले सहकार्य अपेक्षित आहे. तुम्ही तुमच्या मंडळाची, ग्रुपची, कंपनीची, उपक्रमाची जर स्मरणिका काढणार असाल, तर त्यासाठी 'विश्व पांथस्थ' मदत करेल. जमल्यास विशेष अंकदेखील प्रकाशित करता येईल.

**लेखकांसाठी : मराठी टाईप करता येत नसेल, तर हाताने लिहून (स्कॅन करून) लेख पाठविला तरी चालेल. तुम्हाला काही विशेष सूचना करायच्या असतील, तर त्याचे स्वागतच आहे.**

ई मेल editor@panthastha.com
मोबाईल : +९१ ९९७०२३६९०६

# विश्व पांथस्थ

अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

संपादक : **डॉ. संदीप कडवे**

**विश्व पांथस्थ**
वर्ष पहिले, अंक तिसरा
ऑक्टोबर २०१६

अनिवासी भारतीयांसाठीचे पहिले मराठी मासिक

व्यवस्थापकीय संपादक
**संदीप वसंतराव कडवे, दुबई**

संपादकीय साहाय्य
**श्री. राजन तावडे,** अबू धाबी
**श्री. गजानन खोलगाडे,** बहरीन

जाहिरात समन्वय
श्री. समीर खळदकर, पुणे

मांडणी, संपादन, मुद्रितशोधन
मीडियानेक्स्ट इन्फोप्रोसेसर्स प्रा. लि., पुणे

मूल्य : ₹ **100 I AED 10 I US$ 2**

**Vishwa Panthastha**
Volume 1, Issue 3
October, 2016

First Marathi Monthly For NRI Maharashtrians

Managing Editor
**Sandeep Vasantrao Kadwe,** Dubai

Editorial Support
Rajan Tawade, Abu Dhabi
Gajanan Kholgade, Bahrain

Advertisement Co-ordination
Sameer Khaladkar, Pune

Design, Editing, Proofreading
MediaNext Infoprocessors Pvt. Ltd., Pune

Price : ₹ **100 I AED 10 I US$ 2**

'विश्व पांथस्थ'हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक संदीप वसंतराव कडवे यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि., ३१ व ३४, पर्वती इंडस्ट्रियल इस्टेट, पुणे-सातारा रोड, पुणे - ४११०३७ येथे छापून ए-७०३, निसर्ग सिटी-२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे- ४११०५७ येथून प्रसिद्ध केले.
संपादक* - संदीप वसंतराव कडवे.
(*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

'Vishwa Panthastha' monthly publication is owned, printed & published by Sandeep Vasantrao Kadwe, printed at Vikram Printers Pvt. Ltd., 31 & 34, Parvati Industrial Estate, Pune-Satara Road, Pune - 411037 and published at A-703, Nisarga City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411057.
Editor* - Sandeep Vasantrao Kadwe.
(*Responsible for selection of news and articles under the PRB Act.)

All Rights Reserved, 2016 www.panthastha.com / www.kpart.me

# अ नु क्र म णि का


- अनिवासी सीमोल्लंघन... (संपादकीय) ............................४
- 'ग्रंथ तुमच्या दारी'चा मेळावा .....................................६
- 'युएई'तील वाचन चळवळ .......................................१०
- 'विश्व पांथस्थ' : अनिवासी मराठी मंडळींचे नवे व्यासपीठ ...१३
- भूतानमध्ये रंगले 'विश्व मराठी साहित्य संमेलन ................१५
- कविता ..............................................................१८
- या... सहभागी व्हा! 'विश्व पांथस्थ' तुमचेच आहे!.............१९
- भारतीय विदेश सेवा ...............................................२०
- डेस्टिनेशन नायजेरिया.............................................२२
- पांथस्थ : एका वेगळ्या दृष्टिकोनातून............................२७
  ताओमधील कवितांचा मुक्त अनुवाद
- सभासद फॉर्म......................................................२८

संपादकीय

# अनिवासी सीमोल्लंघन...

नुकतेच अनेकांनी दसरा मोठ्या थाटात साजरा केला. प्रत्येकाने आपला एक गड, एक परीघ निर्माण केला आहे आणि त्या परिघातच काय ते वर्षातून एकदा क्षात्रतेज तळपते, असे दिसते आहे. वैश्विक होणे ही काळाची गरज नाही, स्थानिक होणेच आणि त्याच परिघात फिरत राहण्यातच कशी धन्यता आहे, हे जे ते नेते आपल्या अनुयायांसमोर अभिमानाने सांगत आहेत. पुरोगामित्वाची झूल पांघरून थोर विचारवंत रंजल्या गांजल्या जनतेला मागासलेपणाची भीक मागण्यासाठी आंदोलने करण्यास प्रवृत्त करीत आहेत. यात सीमोल्लंघन कोठे होते आहे, असा एक बापुडा प्रश्न मनात उपस्थित झाल्याशिवाय राहत नाही. ही तर सीमेच्या आतच राहण्यासाठी चाललेली धडपड आहे. यात विकसनशीलता असलीच तर मोजक्यांचीच आहे, बाकीच्यांना मागास व परिघाच्या आतच ठेवण्याची धडपड आहे.

या पार्श्वभूमीवर, कोणत्याही दिखाव्याशिवाय, डामडौल न करता गेली अनेक दशके सीमोल्लंघन करून, कोणत्याही आरक्षणाशिवाय परदेशांत अनेक आव्हानांना तोंड देत शांतपणे आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करीत, आपल्या मायदेशाप्रति असलेली आस्था, प्रेम व निष्ठा शाबूत ठेवून स्वतःच्या कुटुंबाच्या व राष्ट्राच्या विकासाला प्रचंड बळ देणाऱ्या अनिवासी भारतीयांचे या दसऱ्याच्या निमित्ताने हार्दिक अभिनंदन!

अनिवासी भारतीय होणे सोपे नाही. मुळातच असलेले बंध तोडणे व नवे जग, नवे घर वसविणे यात एका फार मोठ्या मानसिक आव्हानाला या अनिवासी भारतीयाला सामोरे जावे लागते. सर्वसाधारण भारतीयाला एका चाकोरीत राहायला आवडते असे दिसते. म्हणजे हा अनुभव भारतात कोठेही गेलात तरी येतो. संसाराची व जगण्याची नीट बसलेली घडी मोडण्याची त्याची फारशी तयारी नसते. मग सध्या एखादा पापभिरू माणूस जेमतेम उदरनिर्वाह करू शकेल इतकीच आमदनी असेल, तरीही पटकन जास्त आमदनीसाठी प्रयत्न करेल असे नाही. मध्यमवर्गीय भारतीय जनतेच्या मानसिकतेचे हे एक फार मोठे सामर्थ्य मानले पाहिजे. नाहीतर इतक्या प्रचंड प्रमाणात गरिबी आहे, राज्यकर्त्यांनी साठ वर्षे केवळ आश्वासने दिली, त्या जोडीला भरपूर निराशा दिली, निसर्गाने अनेकदा साथ सोडली, समाजाने अत्याचार केले, तरीही सर्वसामान्य भारतीय माणूस पापभिरू मध्यम मार्ग सोडायला तयार नाही. वेळप्रसंगी त्याचा उद्रेक होतो, पण तो तात्पुरता. पुन्हा चाकोरीत अडकण्यातच तो समाधानी आहे. फार लढण्याची त्याची मानसिकताच नाही. कर्मावर व बऱ्याच अंशी धर्मावर त्याचा अजूनही विश्वास आहे. धर्माचे त्याचे आकलन हे मोठ्या धर्मपंडितांपेक्षा देखील अधिक प्रगल्भ आहे. संस्कृतीचे त्याचे परिमाण हे अनेक सुशिक्षितांपेक्षा अधिक व्यापक आहे.

असा हा मध्यम मार्गी, पापभिरू सर्वसामान्य भारतीय जेव्हा आपले गाव सोडून, राज्य सोडून, देश सोडून, मुख्यतः आर्थिक स्वातंत्र्य मिळविण्याकरता पांथस्थ होण्याचा मार्ग पत्करतो, तेव्हा ते कारणदेखील तसेच महत्त्वाचे असते. काय काय कारणे असतात अशा स्थलांतराची, याचा खरंच खोल अभ्यास केला गेला पाहिजे.

परदेशात नोकरी करणे ही मानसिकता घेऊन जेव्हा आयुष्यभर माणसे काम करतात, तेव्हा मात्र पांथस्थांकरता हे आव्हान अजून कठीण होते. आखातात (दुबई, सौदी वगैरे ठिकाणी) आजकाल ज्या आर्थिक मंदीचे सावट आहे, त्यामुळे अनेकांच्या नोकऱ्या गेल्यात. वाढलेल्या वयात अशा बाजारात नवीन नोकरीही मिळणे कठीण होते. त्यात कुटुंबाची



**डॉ. संदीप कडवे**
संपादक, विश्व पांथस्थ
दुबई, संयुक्त अरब अमिरात

जबाबदारी असेल, तर माणूस फार सैरभैर होताना दिसतो आहे. नोकरी गेल्यावर आलेली आर्थिक अनिश्चितता हे एक मोठे कारण असले, तरी एवढ्या मोठ्या समाजात नोकरी गेलेला माणूस जणू आपली ओळखच गेली, सन्मान गेला, याच भावनेने जास्त अगतिक होताना दिसतो आहे. हाताला काम द्या, समाजात ओळख द्या, अशीच आर्त याचना येथे केली जात आहे. येथे जातीचे सुरक्षाकवच नाही, किंबहुना राष्ट्रीयतेचे देखील फारसे संरक्षण नाही. केवळ अंगभूत गुणांमुळे, थोड्याफार ओळखीमुळे आणि कामावरच्या प्रचंड निष्ठेमुळेच अनेकजण येथे टिकून राहतात. यात तडजोडीही फार कराव्या लागतात. या तडजोडी सर्वसामान्य भारतीयाला भारतात बसून कळणार नाहीत. याचा अर्थ भारतातील सर्वसामान्य माणसाचे आयुष्य फार सुखाचे आहे, असा अर्थ कोणी काढू नये. यात कोणाला कमी लेखण्याचा, कोणाला जास्त महत्त्व देण्याचा उद्देश नाही. अनिवासी भारतीयाचे आयष्य वेगळे, सर्वसामान्य भारतीयाचे आयुष्य वेगळे. दुर्दैवाने परदेशात राहूनही आपल्याभोवती परीघ आखून बंदिस्त जीवन जगणारे आणि इतरांनाही त्यासाठी प्रवृत्त करणारे महाभाग आहेत. कमी-जास्त दोन्ही ठिकाणी आहेत.

असा विश्व पांथस्थ जेव्हा इतर देशांतील लोकांबरोबर काम करतो; अनेक भाषा, धर्म, राष्ट्रीयत्व असलेल्या लोकांबरोबर आपले दैनंदिन जीवन घालवतो, तेव्हा मात्र एक मनुष्य म्हणून तो नक्कीच प्रगल्भ होतो. किंवा तो तसा व्हावा, अशी अपेक्षा आहे. अशा पांथस्थाकडून बाकी समाजाने काय अपेक्षा ठेवावी? सरकार, मोठे बिल्डर्स, टूर ऑपरेटर्स, शैक्षणिक संस्था यांच्यासाठी हा वर्ग महत्त्वाचा आहे, कारण यांच्याकडे खर्च करण्यासाठी, गुंतविण्याकरिता पैसा आहे. तो पैसा जोपर्यंत आहे, तोपर्यंत त्यांना महत्त्व देण्यात येत आहे. हे चित्र मोठे विदारक आहे. देण्यासारखे या पांथस्थाकडे बरेच काही आहे, अनुभव आहे, जगभर ओळखी आहेत, भारताबद्दल नैसर्गिक ओढ व प्रेम आहे, काहीतरी द्यायचे राहून गेले, अशी खंत आहे. हे सर्व घेण्याची भारतीय समाजाची, त्यांना आपल्यात सामावून घेण्याची सर्वप्रथम मानसिकता व त्यानंतर तयारी आहे का? ज्या ज्या ठिकाणी त्याच्या अनुभवाचा, योग्यतेचा, ओळखीचा, सांस्कृतिक प्रगल्भतेचा उपयोग करून घेता येईल, तो करून घेतला गेला पाहिजे.

अशा अनेक मराठी अनिवासी भारतीयांना कित्येक वर्षे परदेशांत घालविल्यावर मायभूमीत येऊन काम करण्याची इच्छा असते. परंतु त्याला येथील स्थानिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, व्यावसायिक, वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी फार मेहनत करावी लागते. येथील माध्यमात येणारे अनेक मुद्दे, विषय हे या पांथस्थ मंडळींकरता संपूर्णपणे निरर्थक असतात. परिघाच्या बाहेर राहून आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करू शकणारे आणि परिघाच्या आत आपले अस्तित्व टिकविलेले यांच्या मानसिकतेत फरक हा असणारच. या दोघांमध्ये जेव्हा निरामय संवाद होऊन मानसिक, सामाजिक, आर्थिक, व्यावसायिक परिघाचीच व्याप्ती जेव्हा वाढेल, तेव्हा खऱ्या अर्थाने विजयोत्सव साजरा करायला हरकत नसावी. अशी देवाण-घेवाण व्हावी हाच 'विश्व पांथस्थ'चा प्रयत्न आहे. अशा दिग्विजयासाठी, दीपावलीसाठी आणि 'विश्व पांथस्थ' परिवाराच्या सर्वांगीण विकासासाठी हार्दिक शुभेच्छा!

editor@panthastha.com

कव्हर स्टोरी




'ग्रंथ तुमच्या दारी'च्या शारजा येथील मेळाव्यात 'विश्व पांथस्थ' मासिकाचे प्रकाशन करण्यात आले

# पहिला आंतरराष्ट्रीय मराठी वाचक मेळावा

*'ग्रंथ तुमच्या दारी'च्या द्वितीय वर्धापननिमित्त शारजामध्ये झालेला वाचक मेळावा खऱ्या अर्थाने वाचकांशी सुसंवाद साधणारा, नवीन वाचक जोडणारा, मराठी साहित्य सर्वांपर्यंत पोहोचविणारा, मराठी साहित्य मनांमध्ये जागृत ठेवणारा, लेखकांशी जोडणारा, साहित्य चळवळ, सहभाग, चर्चा, मते, पाठिंबा या सर्व उद्देशांचा सफल असा आराखडा मांडणारा होता. याच कार्यक्रमात 'विश्व पांथस्थ'चे प्रकाशनही करण्यात आले.*

**अनुजा पडसलगीकर,** शारजा
anuja269@gmail.com

***'हे विश्वचि माझे घर ।***
***ऐसी मती जयाचि स्थिर ।***
***किंबहुना चराचर ।***
***आपण जाहला ।'***

दिनांक १६ सप्टेंबर २०१६ हा दिवस अमिराती आखाती देशांतील अविस्मरणीय ठरला. संत ज्ञानेश्वरांच्या ओवीप्रमाणे ग्रंथांद्वारे वाचक जोडून विश्व आपलेसे करण्याचा ध्यास घेतलेल्या नासिक येथील 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान'चा 'ग्रंथ तुमच्या दारी' हा उपक्रम श्री. विनायक रानडे यांनी अमिराती देशांत डॉ. संदीप कडवे यांच्या सहकार्याने प्रत्यक्ष अमलात आणला. ग्रंथ मराठी बांधवांपर्यंत घरोघरी पोहोचले.

'ग्रंथ तुमच्या दारी' उपक्रमाचा अमिराती देशांतील द्वितीय वर्धापन दिन आणि अमिराती देशांतील 'रीडिंग इयर' या दोन्हींचा दुवा साधत १६ सप्टेंबर रोजी शारजा येथे 'ग्रंथ तुमच्या दारी'चा 'वाचक मेळावा', 'विश्व पांथस्थ' मासिकाचा अनावरण सोहळा, बालनाट्य वाचन आणि प्रसिद्ध लेखक श्री. प्रवीण दवणे यांचा 'माझ्या लेखनाची आनंदयात्रा', 'सावर रे' असा भरगच्च कार्यक्रम 'ग्रंथ तुमच्या दारी'ने अखिल अमिराती मराठी इंडियन्स ('आमी' परिवार) यांचे प्रायोजकत्वाचे सहकार्य घेऊन अत्यंत बहारदारपणे साजरा केला.



**वाचक मेळाव्यानिमित्त झालेल्या स्पर्धेतील विजेत्या बालचमूसह मान्यवर.**

कार्यक्रमाला वाचक आणि प्रेक्षकांचा अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला. दुपारी साडेतीनला सुरू झालेला कार्यक्रम रात्री दहापर्यंत चालला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान'ची माहितीपर दृक्श्राव्य फीत दाखवण्यात आली. सरस्वती वंदना, पाहुण्यांचे आगमन, ओळख आणि त्यांचे मनोगत, समन्वयक परिचय-मनोगत, बालनाट्य वाचन असा कार्यक्रमाचा नियोजनपूर्ण क्रम होता.

'कुसुमाग्रज प्रतिष्ठान'चे माजी विश्वस्त श्री. विश्वास ठाकूर, विश्वस्त श्री. विनायक रानडे आणि दुबईतील प्रख्यात उद्योजक व दुबईत 'ग्रंथ तुमच्या दारी' योजना कार्यान्वित करणारे डॉ. संदीप कडवे आदी मान्यवर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. निमंत्रित विशेष पाहुणे प्रसिद्ध कवी, लेखक श्री. प्रवीण दवणे यांचा 'माझ्या लेखनाची आनंदयात्रा' हा कार्यक्रम पूर्वार्धात होता.

'कुसुमाग्रज प्रतिष्ठान'चे माजी विश्वस्त आणि सर्वेसर्वा श्री. विश्वास ठाकूर यांनी आपल्या मनोगतात, प्रतिष्ठानचा वाचकांपर्यंत पुस्तके नेण्याचा उपक्रम आणि मिळालेला भरघोस प्रतिसाद याचे कौतुक केले. प्रतिष्ठानची स्थापना, अनेक उपक्रम आणि त्यामागचा वाचक जोडण्याचा उद्देश त्यांनी उलगडून सांगितला.

विश्वची माझे घर मानून प्रत्येकापर्यंत ग्रंथ पोहोचवण्याचा ध्यास घेतलेले 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान'चे विश्वस्त श्री. विनायक रानडे यांनी 'वाढदिवशी पुस्तके भेट द्या' या उपक्रमातून रुजत गेलेला वाचक आणि ग्रंथ यांच्या अलवार नात्याचा आता वटवृक्ष होऊन, प्रत्येक देशात त्याच्या पारंब्या विस्तारत आहेत, असे आढावा घेताना सांगितले. 'ग्रंथ तुमच्या दारी' उपक्रम पैशांच्या आधारावर नाही, हेही आवर्जून सांगितले. मराठी माणूस परदेशात किंवा देशात कोणत्याही कारणामुळे ग्रंथ वाचण्यापासून वंचित राहू नये, अशा उद्दात हेतूचा ध्यास म्हणून 'ग्रंथ तुमच्या दारी' योजना आहे, असे सांगून सर्वांनी मराठी समृद्ध साहित्याबरोबर आपली मराठी संस्कृती नेहमी जपावी, असे आवाहनही श्री. रानडे यांनी केले.

पुणे आणि दुबईस्थित व्यवसाय, पंचवीस वर्षांहून अधिक प्रदीर्घ व्यावसायिक अनुभव असलेले प्रख्यात उद्योजक आणि अमिराती देशांत 'ग्रंथ तुमच्या दारी' योजना कार्यान्वित करणारे डॉ. संदीप कडवे यांनी मनोगत व्यक्त करताना, परदेशात असलेले वातावरण आणि माणसाची मराठी साहित्यापासून दुरावल्याची भावना याकरता वाचनाची ओढ पूर्ण करणारी ही योजना आहे असे सांगून, दिवसेंदिवस अधिकाधिक मराठी मंडळी 'ग्रंथ तुमच्या दारी'द्वारे एकेमेकांशी जोडली जात आहेत हा आनंद आहे, असे नमूद केले. ही योजना यशस्वी करण्यासाठी योजनेचे समन्वयकांचे अथक योगदान आहे, हेही आवर्जून सांगितले.

'अखिल अमिराती मराठी इंडियन' (आमी) या दोन हजार मराठी सभासद असलेल्या परिवाराचे कार्यक्रमास प्रायोजकत्व मिळाले. 'आमी'च्या सभासदांना 'ग्रंथ तुमच्या दारी' योजनेसाठी वाचक म्हणून जोडून घेण्यासाठी वाचक मेळावा हा उपक्रम प्रोत्साहन देणारा ठरला. 'आमी'चे संस्थापक श्री. संतोष कारंडे आणि 'सीईओ' श्री. नितीन साडेकर यांनी 'ग्रंथ तुमच्या दारी' आणि 'आमी'चे सहकार्य वृद्धिंगत होईल, असा विश्वास प्रकट केला.

दुबईमधील 'ग्रंथ तुमच्या दारी'च्या समन्वयकांचा परिचय करून देण्यात आला. त्यानंतर समन्वयकांनी आपले मनोगत केले. योजनेचा प्रवास आणि वाचकांशी जोडलेले स्नेहसंबंध हे परिवार दृढ करणारे आहे हा अलवार अनुभव सांगितला. वाचकांना जमत नसेल तर प्रसंगी स्वतःचे पैसे, वेळ आपुलकीने खर्च करणारे, तसेच वाचक आणि समन्वयकांत असलेले ऋणानुबंध हे शब्दांत मांडणे अवघड आहे, अशी भावना व्यक्त



**'ग्रंथ तुमच्या दारी'च्या शारजा येथील मेळाव्याला उपस्थित साहित्यप्रेमी**

करून समन्वयकांकडून कार्यक्रम परिवारनात्यात जोडला गेला. नवीन चार ग्रंथपेट्या दुबई ग्रंथ परिवाराला प्रदान करण्यात आल्या.

'हे विश्वचि माझे घर'प्रमाणे 'ग्रंथ तुमच्या दारी' योजनेशी अविभाज्य नाते असलेल्या 'विश्व पांथस्थ' मासिकाचे अनावरण या कार्यक्रमात करण्यात आले. परदेशांत असलेल्या मंडळींना प्रत्येक बाबतीत मार्गदर्शन करणारे लेख, अनुभव, विविध योजना, मानसिक आधार देणारे, आपलेस करणारे असे हे मासिक डॉ. संदीप कडवे यांचे संपादकीय, तसेच मराठी, भारतीय पदार्थ मिळण्याची ठिकाणे अशी परिपूर्ण माहिती असलेले 'विश्व पांथस्थ' मासिक मैत्र म्हणून प्रत्येकाच्या घरात दरमहा पोहोचविण्याची योजना कार्यान्वित करण्यात आल्याची माहिती या वेळी देण्यात आली. तसेच दुबईमधील 'बॉम्बे बाईट्स' आणि 'मुंबईकर' या रेस्टॉरंटमध्ये 'विश्व पांथस्थ'चे अंक उपलब्ध असतील, असे जाहीर करण्यात आले.

बाल कलाकारांचे बालनाट्य वाचन सादर झाले. मराठी मातृभाषा असली, तरी अनेक वर्षे अमिराती देशांत राहत असल्याने मराठी बोलण्या-वाचनापासून फारकत असलेल्या, इंग्लिश माध्यमात शिकणाऱ्या वय वर्षे अवघे पाचपासून दहा पर्यंतच्या बाल मंडळींनी अस्लखित मराठी उच्चारात अत्यंत उत्कट, अर्थपूर्ण हावभावासह उत्कृष्टपणे बालनाट्य वाचन केले. उपस्थितांनी या बाल मंडळींचे विशेष कौतुक टाळ्यांच्या कडकडात मनमुराद केले.

प्रसिद्ध कवी आणि लेखक श्री. प्रवीण दवणे यांनी 'माझ्या लेखनाची आनंदयात्रा'मध्ये साहित्यकांच्या सहवासातील आठवणींचा तजेलदार गुलमोहर सादर केला. श्रोत्यांना पुस्तकांपर्यंत नेणारा आणि वाचकांना व्याख्यानांकडे आणणारा प्रवाही हृदयसंवाद हा जुन्या आणि नवीन वाचकांना साहित्याशी संवाद करण्यासाठी मार्गदर्शन करणारा होता. वाचकांच्या प्रतिक्रिया आणि त्यांच्याशी संवाद साधला गेला. विविध प्रश्न विचारून वाचकांची जिज्ञासा प्रोत्साहित केली गेली. वाचकांच्या प्रतिक्रिया 'ग्रंथ तुमच्या दारी' योजनेसाठी नैतिक बळ देणाऱ्या ठरल्या आणि वाचकांच्या अपेक्षा, मते यांची नोंद घेतली गेली.



मध्यंतरानंतर श्री. प्रवीण दवणे यांच्या 'सावर रे' या 'आमी'पुरस्कृत कार्यक्रमा आकर्षण होते. आपल्या सगळ्या परिश्रमांची, धावपळीची बेरीज 'आनंद' होते का, असा अंतर्मुख करणारा, मनाचा संवाद कसा वाढवावा, यश हे राईस प्लेटसारखे रेडीमेड मिळत नसते हे वास्तव सांगणारा, मनातील घर जपलं पाहिजे हा आपुलकीचा संवाद साधणारा 'सावर रे' सर्व उपस्थितांना आनंद देणारा ठरला.

मान्यवर उपस्थित आणि साहित्यप्रेमी प्रेक्षकांचे, कार्यकारिणी सभासद, प्रायोजक, 'आमी' परिवार आणि अमिराती देशांचे आभार व्यक्त करून, 'आमी'ने घेतलेल्या बालचमूंच्या चित्रकला स्पर्धेतील उत्कृष्ट चित्रांना पारितोषिके देऊन, तसेच 'ग्रंथ तुमच्या दारी'ने ठेवलेल्या निबंध स्पर्धेतील बक्षीसपात्र निबंधांना पारितोषिक देऊन कार्यक्रमाची सांगता झाली. पुन्हा लवकर भेटू, अशा निरोपाने 'ग्रंथ तुमच्या दारी' योजनेचा द्वितीय वर्धापन दिन सोहळा आणि 'वाचक मेळावा' हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

वाचक मेळावा खऱ्या अर्थाने वाचकांशी सुसंवाद साधणारा, नवीन वाचक जोडणारा, मराठी साहित्य सर्वांपर्यंत पोहोचविणारा, मराठी साहित्य मनांमध्ये जागृत ठेवणारा, लेखकांशी जोडणारा, साहित्य चळवळ, सहभाग, चर्चा, मते, पाठिंबा या सर्व उद्देशांचा सफल असा आराखडा मांडणारा होता.

डॉ. संदीप कडवे यांनी २० जून २०१५ रोजी दुबईमधे 'ग्रंथ तुमच्या दारी' योजना प्रत्यक्षात आणली. योजनेच्या द्वितीय वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त 'वाचक मेळावा' आयोजित करण्यात आला होता. त्याला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. 'विश्व पांथस्थ'च्या दुसऱ्या अंकात 'ज्ञानपीठ'प्राप्त डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी 'अनिवासी मराठी करतील संस्कृती समृद्ध' असा विश्वास व्यक्त करून 'ग्रंथ तुमच्या

दारी' आणि 'विश्व पांथस्थ'साठी शुभेच्छा दिल्या आहेत. 'ग्रंथ तुमच्या दारी' योजनेची लोकप्रियता, 'विश्व पांथस्थ' वाचण्याची उत्सुकता वाढतच आहे. डॉ. नेमाडे यांचा विश्वास सार्थ आहे, याची पोचपावती म्हणजे 'ग्रंथ तुमच्या दारी वाचक मेळावा दुबई' हा कार्यक्रम आहे.

'ग्रंथ तुमच्या दारी' दुबईचे डॉ. संदीप कडवे यांच्याशी संवाद साधला असता, त्यांनी 'ग्रंथ तुमच्या दारी' आणि 'विश्व पांथस्थ' नेहमीच सेवाभावी वृत्तीने कार्यरत राहील, असे सांगून आश्वस्त केले. बऱ्याच देशांमध्ये ग्रंथ पेट्या असून, 'ग्रंथ तुमच्या दारी' योजना आणि 'विश्व पांथस्थ' लवकरच विश्वव्यापी होईल, असा विश्वास व्यक्त केला. 'ग्रंथ तुमच्या दारी' दुबई परिवाराने आयोजित केलेला हा भव्य असा वाचक मेळावा प्रत्येक देशात व्हावा, अपेक्षा व्यक्त करून त्यासाठी मार्गदर्शन आणि पूर्ण सहकार्य असेल, असे डॉ. कडवे यांनी सांगितले.

एकंदरीत कार्यक्रमाचा आढावा घेतल्यास 'ग्रंथ तुमच्या दारी' दुबई परिवाराने अत्यंत नियोजनपूर्वक वाचक मेळावा आयोजित केला. 'अखिल अमिराती मराठी इंडियन्स'ने कार्यक्रमाच्या प्रायोजकत्वाची जबाबदारी उत्तमरीत्या पार पडली. 'आमी' परिवाराचे सदस्य 'ग्रंथ तुमच्या दारी' योजनेबरोबर जोडले गेले. मराठी माणूस एकत्र आल्यावर एक उत्तम अशी कलाकृती आकारास येते याचे उत्तम उदाहरण म्हणजे हा कार्यक्रम आहे, असे म्हणणे योग्य ठरेल.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. विश्वास ठाकूर, श्री. विनायक रानडे, डॉ. संदीप कडवे यांनी उपस्थित वाचक, साहित्यप्रेमी मंडळींबरोबर 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान', 'ग्रंथ तुमच्या दारी', 'विश्व पांथस्थ' मासिक याबद्दल अत्यंत परिपूर्ण असा सुसंवाद साधला. आपले सर्वांचे आभार. विशेष अतिथी म्हणून प्रसिद्ध लेखक, कवी श्री. प्रवीण दवणे यांनी 'माझ्या लेखनाची आनंदयात्रा' आणि 'सावर रे' कार्यक्रम सादर करून जीवनाकडे आनंदाने बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन दिला. प्रसिद्ध लेखक श्री. रवींद्र गुर्जर यांची कार्यक्रमास असलेली विशेष उपस्थिती प्रेरणादायी होती. प्रसिद्ध समीक्षक श्री. वि. भा. देशपांडे यांचे प्रोत्साहन आणि आशीर्वाद कार्यक्रमास लाभले. आपल्या सर्वांचे खास आभार!

'ग्रंथ तुमच्या दारी' दुबईचे सर्व समन्वयक, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या सर्व मान्यवरांचे आणि सन्मानीय प्रायोजकांचे आभार. 'आमी' परिवारचे सदस्य आणि मान्यवर पदाधिकारी यांच्या साहाय्यासाठी आणि प्रोत्साहनासाठी आभार. बालनाट्य कलाकारांचे विशेष कौतुक.

कार्यक्रम यशस्वी होण्यात 'आमी' परिवारचे संतोष कारंडे, नितीन साडेकर, 'ग्रंथ तुमच्या दारी' दुबईचे विशाखा पंडित, अपर्णा पैठणकर, धनश्री पाटील, प्रचिती तलाठी, डॉ. सुप्रिया सुधाळकर, सुजाता भिंगे, अनुजा पडसलगीकर, निखिल जोशी, किशोर मुंढे, रोहन पैठणकर, निशांत पंडित यांचा सहभाग विशेष उल्लेखनीय होता. आपल्या सर्वांचे आभार!

'कुसुमाग्रज प्रतिष्ठान'चे विशेष आभार!


## विश्व पांथस्थ वर्गणी अर्ज

| विश्व पांथस्थ | 1 वर्षासाठी | 2 वर्षांसाठी | 3 वर्षांसाठी | चेक/ड्राफ्ट या नावाने काढावा* |
|---|---|---|---|---|
| भारतातील वर्गणीदारांसाठी | ₹ 1,200 | ₹ 2,000 | ₹ 3,000 | Vishwa Panthastha |
| 'युएई'तील वर्गणीदारांसाठी | AED 120 | AED 200 | AED 300 | Knowledge Partners Publications Trading LLC |
| परदेशातील वर्गणीदारांसाठी | US$ 36 | US$ 54 | US$ 80 | |

*कुरियर/पोस्टेज व बँक चार्जेस अतिरिक्त. | Cheque / Draft payable in Pune or Dubai

• नाव : ..........

• संपूर्ण पत्ता : ..........

• शहर : .......... • राज्य: .......... • देश : ..........

• पिन कोड : (आवश्यक) .......... • दूरध्वनी / मोबाईल : : ..........

• ई-मेल : ..........

• एकूण रक्कम : • चेक/ड्राफ्ट क्र :

विश्व पांथस्थ

Email : editor@panthastha.com | Website : www.panthastha.com
ए-७०३, निसर्ग सिटी-२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे- ४११०५७

वृत्तांत



'ग्रंथ तुमच्या दारी'च्या वतीने घेण्यात आलेल्या 'मला भावलेले पुस्तक' या विषयावरील निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरण प्रसिद्ध साहित्यिक प्रवीण दवणे यांच्या हस्ते झाले

# 'युएई'तील वाचन चळवळ

*'ग्रंथ तुमच्या दारी'च्या वाचक मेळाव्याचा उद्देश अधिकाधिक वाचकांपर्यंत वाचन चळवळ पोहोचविणे हा होता. वाचनाची आवड स्वत:पुरती न ठेवता तिला चळवळीचे रूप देणे आणि लोकांना वाचनासाठी प्रेरणा देण्यापुरतेच न थांबता मोफत ग्रंथही उपलब्ध करून देणे, ही सर्वसाधारण गोष्ट नव्हती. डॉ. संदीप कडवे यांनी ही कल्पना प्रत्यक्षात आणली.*

**गणेश भाऊसाहेब पोटफोडे,** युएई

'युएई'त यंदाचे वर्ष 'वाचक वर्ष' (रीडिंग इयर) म्हणून घोषित करण्यात आले होते. त्यातच 'ग्रंथ तुमच्या दारी'ला दुबईत दोन वर्षे पूर्ण होत होती. या दोन्हींचे औचित्य साधून 'ग्रंथ तुमच्या दारी'च्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त एक 'वाचक मेळावा' आयोजित करावा, अशी कल्पना 'ग्रंथ तुमच्या दारी'चे दुबईतील मुख्य समन्वयक डॉ. संदीप कडवे यांच्या मनात आली. या मेळाव्यात सर्व वाचक, समन्वयक आणि भारतातून एखाद्या साहित्यिकाला आमंत्रित करायचे असे ठरले. या मेळाव्याचा उद्देश म्हणजे अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचून 'ग्रंथ तुमच्या दारी'चा विस्तार करणे हा होता. ज्या वेळी वाचक मेळाव्याची तयारी सुरू झाली, तेव्हा कळले की मेळावा सप्टेंबर महिन्यात घेण्यात येणार असून, यात मुख्य वक्ते म्हणून प्रसिद्ध साहित्यिक आणि गीतकार प्रवीण दवणे यांना आमंत्रित करण्यात आले आहे. खरंतर प्रवीण दवणे यांच्यासारखे मराठी साहित्यविश्वातील प्रसिद्ध साहित्यिक येणार हीच माझ्यासाठी आणि दुबईतील समस्त वाचकांसाठी आनंदाची मोठी गोष्ट होती. मेळावा आयोजित करण्याचे ठरल्यापासून मी

अगदी चातकासारखी या सोहळ्याची वाट पाहू लागलो.

'ग्रंथ तुमच्या दारी' व अखिल अमिराती मराठी इंडियन्स' (आमी) परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने हा मेळावा आयोजित करण्यात येणार होता. 'आमी' परिवार या संस्थेने अल्पावधीतच दुबईत मोठी लोकप्रियता मिळविली आहे. सामाजिक व सांस्कृतिक कार्याच्या माध्यमातून त्यांनी मराठी माणसांचे एक मोठे संघटन केले आहे. 'आमी' परिवाराने वाचक मेळाव्याची जबाबदारी व्यवस्थितपणे पेलवत 'ग्रंथ तुमच्या दारी'च्या मदतीने कार्यक्रमाची जय्यत तयारी करून कार्यक्रमाचे व्यवस्थित नियोजन केले. स्थळ ठरले शारजा विद्यापीठाचे सभागृह.

जेव्हा मेळाव्याला मी शारजा विद्यापीठाच्या सभागृहापाशी पोहोचलो, तेव्हा माझा विश्वासच बसत नव्हता एवढी गर्दी होती. सभागृह खचाखच भरून गेले होते. हा सर्व समन्वयक आणि 'आमी' परिवार यांनी मेळाव्यासाठी घेतलेल्या अखंड मेहनतीचा परिणाम होता. मेळाव्यास 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान'च्या वतीने विनायक रानडे, विश्वास ठाकूर उपस्थित होते. आणखी एक योगायोग म्हणजे प्रसिद्ध अनुवादक आणि लेखक रवींद्र गुर्जर या वेळी सुट्टीसाठी दुबईत आलेले होते. त्यांनाही या कार्यक्रमाची माहिती मिळाल्याने ते या मेळाव्यास आवर्जून उपस्थित राहिले. 'आमी'चे संस्थापक संतोष कारंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन साडेकर, तसेच 'ग्रंथ तमच्या दारी'च्या सर्व समन्वयकांसह डॉ. संदीप कडवे व्यासपीठावर उपस्थित होते.

भारतीय संस्कृतीप्रमाणे कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाले. 'युएई'त इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या मुलींनी सरस्वती वंदना सादर करून कार्यक्रमात एक चैतन्य निर्माण केले. 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान'चे विश्वस्त आणि 'ग्रंथ तुमच्या दारी'चे प्रवर्तक विनायक रानडे यांनी ही योजना सुरू करण्यामागचे आपले अनुभव सांगितले. दुबईनंतर ग्रंथ आता जगाच्या विविध देशांत पोहोचले असून, दुबईत ५१ ग्रंथपेट्यांचे आपले स्वप्न असल्याचे त्यांनी सांगितले. खरोखरच या माणसात काहीतरी वेगळे रसायन असल्याचे जाणवले. वाचनाची आवड स्वतःपुरती न ठेवता तिला चळवळीचे रूप देणे आणि लोकांना वाचनासाठी प्रेरणा देण्यापुरतेच न थांबता मोफत ग्रंथही उपलब्ध करून देणे, ही सर्वसाधारण गोष्ट नव्हती. ही व्यक्ती माझ्या मनात घर करून गेली.

बऱ्याच दिवसांपासून प्रतीक्षा असलेल्या डॉ. संदीप कडवे संपादित 'विश्व पांथस्थ' या परदेशातील मराठी लोकांसाठी असलेल्या पहिल्या मासिकाचे या मेळाव्यात प्रकाशन झाले. गेल्या जवळपास एक वर्षांपासून डॉ. कडवे या मासिकासाठी मेहनत घेत होते. त्यांची मासिकासाठीची धडपड मी जवळून अनुभवली होती. अनेक दिव्ये पार करून हे मासिक वास्तवात आल्याने खरोखरच मराठी माणसांनी डॉ. संदीप कडवे यांचे आभार मानायला हवेत. आखातात मराठी मासिक प्रकाशित होणे ही एक ऐतिहासिक घटना म्हणावी लागेल, कारण इतर भारतीय भाषांतली कितीतरी दैनिके, साप्ताहिके आणि मासिके दुबईतून प्रसिद्ध होत असतात. जवळपास दीड लाख मराठी माणसांची संख्या असणाऱ्या या देशात मराठी माणसांसाठी त्यामानाने साधे त्रैमासिकही येथे प्रकाशित होत नव्हते. 'विश्व पांथस्थ'च्या रूपाने ही उणीव आता भरून निघणार आहे. हे मासिक आखाती मराठी माणसांचा आरसा होऊन उदयाला येईल, याबाबत मला अजिबात शंका नाही.

प्रवीण दवणे यांनी दोन वेगवेगळ्या विषयांवर व्याख्यान दिले. पहिल्या सत्रात 'माझ्या लेखनाची आनंदयात्रा' आणि दुसऱ्या सत्रातील 'सावर रे' सादर करून रसिक प्रेक्षकांना मोहित केले. 'माझ्या लेखनाची आनंदयात्रा'मध्ये श्री. दवणे यांनी आपल्या साहित्यिक प्रवासाचे अत्यंत सुंदर वर्णन केले. आपले बालपणीचे विविध अनुभव सांगून त्यांनी श्रोत्यांना कधी हसवले, तर कधी भावनिक बनवले. आजच्या आधुनिक काळात तरुण पिढी मोबाईलसारख्या उपकरणांच्या आहारी जाऊन वाचन संस्कृती विसरत चालली आहे. पैशांच्या मागे न धावता खऱ्या बौद्धिक श्रीमंतीच्या मागे लागा, मातृभाषेवर प्रेम करा आणि वर्तमानात जगा, असा संदेश त्यांनी दिला. दवणे यांनी पु. ल. देशपांडे, कुसुमाग्रज, मंगेश पाडगांवकर, लता मंगेशकर, आशा



भोसले यांच्या सहवासात अनुभवलेल्या अनेक आठवणी ताज्या केल्या. गीतलेखन करण्यास किती मेहनत घ्यावी लागायची याचे अविस्मरणीय अनुभव सांगून त्यांना सर्वांना आश्चर्यचकित केले. सभागृहात बसलेल्या सर्व वाचक आणि प्रेक्षकांना हे व्याख्यान संपूच नये असे वाटत होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवयित्री व प्रसिद्ध निवेदिका अनुजा पडसलगीकर यांनी उत्तम प्रकारे करून कार्यक्रमाची रंगत वाढविली. वाचकांना सहजपणे प्रश्नोत्तरांमध्ये गुंगवून प्रचिती तलाठी यांनी त्यांना सहभागी करून घेतले. 'ग्रंथ तुमच्या दारी'च्या निवडक वाचकांना मनोगत व्यक्त करण्याची संधी मिळाली. त्या निवडक वाचकात माझा समावेश होता. मी कुसुमाग्रज यांच्यात कवितेचा संदर्भ देऊन माझे मनोगत व्यक्त केले.

आम्हा घरी आहे
शब्दांचेच धन
शब्द देता घेता
झाले आहे आता
शब्दांचेच मन

माझ्या मनात शब्द पेरण्यात 'ग्रंथ तुमच्या दारी'चा मोठा वाटा होता. मी सर्व 'ग्रंथ' टीमचे आभार मानले. मनोगत व्यक्त केल्याबद्दल मला वाचक मेळाव्याचे स्मृतीचिन्ह म्हणून एक छानसा कॉफी मग भेट मिळाला.

मध्यंतरात रवींद्र गुर्जर, विनायक रानडे आणि प्रवीण दवणे यांच्याशी मला गप्पा मारण्याची संधी मिळाली. प्रवीण दवणे यांची काही पुस्तकेही विक्रीला उपलब्ध होती. त्यातील अलीकडेच प्रकाशित झालेला 'एक कोरी सांज' हा काव्यसंग्रह विकत घेऊन त्यावर दवणे यांचा स्वाक्षरी संदेश मिळविला. मी डॉ. संदीप कडवे यांची भेट घेऊन 'विश्व पांथस्थ' मासिकाबद्दल त्यांचे अभिनंदन केले. 'ग्रंथ तुमच्या दारी'ची पेटी मी राहत असलेल्या देरा भागात उपलब्ध नव्हती. मी त्यांना विनंती केली, की एखादी शिल्लक पेटी असल्यास तिची जबाबदारी मला देण्यात यावी. या मेळाव्यासाठी विनायक रानडे यांनी भारतातून चार नवीन पेट्या वितरित करण्यासाठी आणल्या होत्या. योगायोगाने त्यातील एक पेटी शिल्लक होती. डॉ. कडवे यांनी तत्काळ ती पेटी मला देण्याचे मान्य केले. या कार्यक्रमात मला ती पेटी मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. ग्रंथ पेटी मिळाल्याने मी फार भारावून गेलो. आजपर्यंत 'ग्रंथ तुमच्या दारी'चा एक वाचक होतोच, शिवाय आता नवीन जबाबदारी मिळाली, समन्वयक म्हणून.

या कार्यक्रमानिमित्त दोन महिन्यांपूर्वी सर्व वाचकांसाठी 'ग्रंथ पेटीने मला काय दिले' आणि 'मला भावलेले पुस्तक' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्या स्पर्धेचा निकाल व बक्षीस समारंभ या कार्यक्रमात झाला. रणजीत देसाई यांच्या 'स्वामी' या ऐतिहासिक कादंबरीवर मी 'मला भावलेले पुस्तक' हा विषय घेऊन निबंध लिहिला होता. त्याला बक्षीस मिळणे माझ्यासाठी अजून एक आश्चर्याचा धक्काच होता. बक्षीस म्हणून प्रवीण दवणे यांच्या स्वाक्षरीतील त्यांचेच 'रे जीवना' हा अमूल्य ठेवा मिळाला.

'ग्रंथ तुमच्या दारी'चा हा मेळावा यशस्वी करण्यासाठी समन्वयक टीममधून विशाखा पंडित, धनश्री पाटील, किशोर मुंढे, निखिल जोशी, श्रीकांत पैठणकर यांनी फार मेहनत घेतली. डॉ. सुप्रिया सुधाळकर यांनी पाच ते बारा वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांकडून उत्कृष्ट नाट्यवाचन करवून घेतले. आखाती देशात जन्मलेल्या, वाढलेल्या मुलांचे मराठी वाचन ऐकून श्री. प्रवीण दवणे यांनी त्यांचे जाहीर कौतुक केले. अन्य समन्वयक नेमिका जोशी, अपर्णा पैठणकर, उमानंद आणि जयश्री बागडे, नीलम नांदेडकर, नीलिमा वाडेकर, समीक्षा जावळे, श्वेता करंदीकर, श्रिया जोशी आणि वीरभद्र कारेगावकर उपस्थित होते.

हा पहिला आंतरराष्ट्रीय वाचक मेळावा यशस्वी झाला. गेल्या तीन महिन्यांपासून अविरत परिश्रमाचे चीज झाले. वाचक मेळाव्याची सांगता एका चिमुकलीने गायलेल्या 'पसायदाना'ने झाली. 'पसायदाना'चे 'येणे वरें ज्ञानदेवो सुखिया झाला ।' हे शेवटचे शब्द कानांवर पडले. कार्यक्रम संपला. माझ्यातला वाचक खरोखरच सुखिया होऊन ज्ञानाची शिदोरी घेऊन घरी परतत होता. मी ग्रंथपेटी, निबंध स्पर्धेत मिळालेले बक्षीस, आठवण भेट कॉफी मग घेऊन सभागृहाच्या बाहेर पडलो.

■


## कोणी घर विकतंय का घर?
## सावधान !!

❍ कोणत्याही कारणास्तव आपण घर, फ्लॅट, बंगला, फार्म हाऊस, जमीन विकणार असाल तर तुम्हाला भांडवली नफा (Capital Gain) नक्कीच होणार. नफा झाला की टॅक्स भरावाच लागणार.

❍ यासंदर्भात अनिवासी भारतीयांसाठी एकाच ठिकाणी अनुभवी सीएचा सल्ला आणि कायदेशीर मार्गदर्शन मिळण्याची सोय सौ. गौरी कौस्तुभ देव यांनी पुण्यात करून दिली आहे.

❍ कोणतीही प्रॉपर्टी विकत घेण्याच्या निर्णयापूर्वी आपण वरील दोन्ही सेवांचा लाभ घेतल्यास फसवेगिरीतून वाचण्याची शक्यता आहे. आपली सेवा करण्याची संधी मिळाली तर सल्ला फीमध्ये निश्चितच सवलत मिळणार.

**Lakshmi Keshav Consultants**

२७/३, हिंगणे खुर्द, फ्लॅट ३ सी,
श्री चिंतामणी अपार्टमेंट, सिंहगड रोड, पुणे - ४११०५१
मोबाईल : गौरी : ८६००१ ६६२९७/ ९७३०० ७३९२४
ई-मेल : lakshmikeshavconsult@gmail.com

विश्व मराठी साहित्य संमेलन (६ वे), भूतान, २०१६-१७

शिवसंघ प्रतिष्ठान



साहित्य दिंडीप्रसंगी संमेलनाध्यक्ष संजय आवटे, उद्घाटक हरी नरके, स्वागताध्यक्ष निलेश गायकवाड, प्रमुख संयोजक प्रमोद गायकवाड आदी

# भूतानमध्ये रंगले विश्व मराठी साहित्य संमेलन

*'सहावे विश्व मराठी साहित्य संमेलन' नुकतेच आनंदी लोकांचा देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भूतानची राजधानी थिम्पू येथे पार पडले. ग्रंथदिंडी, परिसंवाद, विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगलेल्या या संमेलनाला साहित्यरसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यात भारतातील हैदराबाद, बडोदा, इंदूर या शहरांबरोबरच दुबई, अमेरिका, आस्ट्रेलिया, सिंगापूर येथील मराठी साहित्यप्रेमींचा सहभाग होता. तसेच भूतानचे नागरिकही त्यात उत्साहाने एकरूप झाले होते.*



'विश्व मराठी साहित्य संमेलना'ला उपस्थित असलेले साहित्यप्रेमी

## आनंदी लोकांच्या देशात मराठमोळा सोहळा

आनंदी लोकांची आनंदनगरी म्हणून भूतान या देशाची जगभरात ख्याती आहे. अशा आनंदनगरीत आपल्या मराठीची पताका फडकली आणि त्यात मराठीजनच नव्हे, तर येथील आनंदी लोकही सहभागी झाले. तिथे भाषेची अडचण नव्हतीच, संबंध होता फक्त भावनांचा. भाषेच्या माध्यमातून, साहित्याच्या माध्यमातून माणसे जोडली जातात हा साहित्य संमेलनाचा उद्देश असतो आणि तो येथे सफल झाला. ग्रंथदिंडी असो, परिसंवाद असो, चर्चासत्र असो, वा भूतानच्या स्थानिकांचे सांस्कृतिक कार्यक्रम असो, त्यात मराठी आणि भूतानचे साहित्यरसिक एकरूप झाले होते.

## थिम्पूमध्ये मराठमोळ्या ग्रंथदिंडीची रंगत

'अ' ते 'ज्ञ' अक्षरांचा गजर झाला. ज्ञानोबा-तुकारामाच्या नामाची साथ. मराठी ध्वजपताका आणि या माध्यमातून सातासमुद्रापार चाललेला मराठीचा प्रवाह असा माहोल आनंदी माणसांनीही अनुभवत आपला आनंद द्विगुणित केला. थिम्पू भूमीही ग्रंथदिंडीने दुमदुमली होती. या दिंडीत महाराष्ट्रातून गेलेले मराठीजन सहभागी झाले होतेच; त्याचबरोबर दुबई, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया या देशांसह हैदराबाद, बडोदा, इंदूर येथील मराठी साहित्यरसिक, साहित्यिक सहभागी झाले होते. अनेकांनी या दिंडीत तालही धरला होता.

## माध्यमे या विषयावर रंगला परिसंवाद

या साहित्य संमेलनाचा विषयच 'माध्यमे' असा होता. याच विषयावरील परिसंवादात वक्त्यांनी आपापली मते मांडली. परिसंवादाची सूत्रे 'दिव्य मराठी'चे डेप्युटी एडिटर अभिजित कुलकर्णी यांच्याकडे होती. या परिसंवादात सावरकर साहित्याचे अभ्यासक प्रसाद पिंपळखरे, चंद्रकांत शहासने, दुबई येथील 'महाराष्ट्र मंडळा'चे अध्यक्ष डॉ. संदीप कडवे, सिंगापूर येथील महाराष्ट्रीय उद्योजक राजेंद्र धर्माधिकारी आणि पत्रकार सुशांत सांगवे यांनी सहभाग घेतला.

## स्थानिक सांस्कृतिक कार्यक्रमांनी बहार

आनंदी लोकांचा देश असे भूतानला म्हटले जाते. येथील लोकसंस्कृती, लोककलाही तशाच रसिकांना आनंद देणाऱ्या आणि डोळे दिपवून टाकणाऱ्याच आहेत. या लोककला येथील स्थानिक कलाकारांनी सदर केल्या. वेगळी वाद्ये, त्यात विशिष्ट प्रकारे धरलेला ठेका आणि अलगद केलेल्या अदा यांमुळे या लोकनृत्याने उपस्थितांनाही ताल धरायला भाग पाडले. केवळ नृत्यच नव्हे, तर त्या नृत्याला साजेशी वेगळी वेशभूषा देखील लक्षवेधी होती.






संमेलन स्मरणिका प्रकाशनप्रसंगी हैदराबाद येथील ज्येष्ठ मराठी व्यावसायिक भाऊराजे जहागिरदार, स्वागताध्यक्ष निलेश गायकवाड, उद्घाटक हरी नरके, संमेलनाध्यक्ष संजय आवटे, भूतानचे माजी शिक्षणमंत्री व प्रमुख अतिथी ल्युंपो ठाकुरसिंग पौडेल, प्रमुख संयोजक प्रमोद गायकवाड, दुबई महाराष्ट्र मंडळाचे प्रमुख संदीप कडवे आदी.



संमेलनाला महाराष्ट्रातून गेलेल्या रसिक जनांसह इतर देशातील व थिम्पू शहरातील नागरिकांनीही संमेलनातील विविध कार्यक्रमांचा आस्वाद घेतला.

# वाळवंटातील तुळस

कंपनी समोरच्या त्या ओट्यावर
एक हिरवीगार तुळस नियमित बहरते
पूर्वजांच्या देशातल्या आम्हा बांधवांना
ती रोज आपुलकीने निरखते

कोण कुठली मी आभागी म्हणत
आपली केविलवाणी पाने फडफडवते
स्वच्छंदी होऊन वाऱ्याबरोबर झुलते
स्वतःशीच कधी हसते कधी रुसते

सणासुदीला ती फार एकटी पडते
कार्तिक द्वादशीला तिची नजर
चातकासारखी चहूकडे भिरभिरते
चिंचा, सीताफळ, बोरांची ती वाट पाहते

या ओसाड वाळवंटातील उन्हात
ती फार तळमळतेय घुटमळतेय
गटारीच्या पाझरात मुळे घट्ट करून
आपुलकीची आपली माणसे शोधतेय

तिची इवली इवलीशी हिरवी पाने
जांभळ्या फुलांच्या कोवळ्या मंजिऱ्या
वाळून उगवलेल्या बियांची टवटवीत रोपे
नियतीच्या तुरुंगात पडलीयेत दूर देशी

रोज जाता येता ती आमच्याकडे पाहते
पण जाणिवेच्या तप्त निखाऱ्यात
निरंतर जाळणाऱ्या स्वतःच्या मनाला
कवटाळून ती अबोल होऊन जाते

एक वाळवंटातील तुळस होऊन
ती म्हणत असेल मला नाही, पण
माझ्या सावलीत वाढणाऱ्या रोपांना तरी
एखाद्या वृंदावनाची कुंडी मिळेल का?

**- गणेश भाऊसाहेब पोटफोडे,** युएई

*ताओ मधील कवितांचा मुक्त अनुवाद*

# तुलना निरर्थक आहे...

***भगवद्‌गीतेतील निष्काम कर्म आणि या कवितेतील विचार यांमध्ये आपल्याला निश्चितच साम्य आढळून येईल. व्यवहार करताना सामान्यपणे आपण तुलना करतोच. परंतु तुलना हा मानवी मनाचा गुण आहे, वस्तूंचा नाही याची जाणीव ऋषिमुनींना असते. तुलनेमुळेच आपल्याला हा श्रीमंत, हा गरीब असे जाणवत असते. परंतु द्रष्टा पुरुष या भेदभावात गुंततच नाही.***

जगाचं लक्ष जरी वेधलं जात असलं सौंदर्याकडे,
तरी कुरूपपणाही तिथे आहे.
सर्व लोक चांगुलपणाचा स्वीकार चांगुलपणा म्हणून करतात,
परंतु चांगुलपणाबरोबर दुष्टपणाही असतो जगात.

कारण अस्तित्व आणि नास्तित्व निर्मितात परस्परांना
कठीण आणि सुलभ आहेत परस्परपूरक.
दूर आणि जवळ घालतात परस्परांवर मर्यादा
उंच आणि खाली यांना आधार आहे परस्परांचा
ध्वनी आणि तीव्रता निर्माण करतात सुसंवाद
आधी आणि नंतर करतात परस्परांचा पाठलाग.

यामुळे निष्काम पुरुषाचं वागणं असतं
निष्काम कर्मांनी युक्त
शिकवत नाही तो शब्दांनी.
इथे गूढ गोष्टी निर्मिल्या जात असतात
परंतु करत नसतात त्या कुणातच भेदभाव.
आपल्या जीवनासाठी देतो तो सर्व काही

त्यामुळे द्रष्टा पुरुष करत असतो निर्मिती
स्वामित्वभावाशिवाय,
करतो तो सर्व काही निरपेक्षपणे
फलाशेमध्ये न गुंतता.

मिळालं जरी त्याला यश
तरी नसतं त्याला त्याचं भान
आणि नसतं त्याला त्याचं भान म्हणूनच
सोडत नाही यश कधी त्याला.

**- श्री. ब्रिजमोहन हेडा**

# भारतीय विदेश सेवा

*विदेश में स्थित भारतीय युवक भारतीय विदेश सेवा के बारे में शायद कम जानकारी रखते है। यह जानकारी उनके लिये महत्त्वपूर्ण हो सकती है इस हेतू नीचे प्रस्तुत कि गयी है।*

भारतीय विदेश मन्त्रालयके कार्य को चलाने के लिए एक विशेष सेवा वर्ग का निर्माण किया गया है जिसे 'भारतीय विदेश सेवा' (Indian Foreign Service - I.F.S.) कहते हैं। यह भारत के पेशेवर राजनयिकोंका एक निकाय है। यह सेवा भारत सरकार की केंद्रीय सेवाओं का हिस्सा है। भारत के विदेश सचिव भारतीय विदेश सेवा के प्रशासनिक प्रमुख होते हैं।

भारतीय राजनय अब संभ्रान्त परिवारों, राजा-रजवाड़ों, सैनिक अफ़सरों आदि तक ही सीमित न रहकर सभी के लिए खुल गया है। सामान्य नागरिक अपनी योग्यता और शिक्षा के आधार पर इस सेवा का सदस्य बन सकता है।

सन १९४७-१९४८ की विशेष संकटकालीन भरती के अलावा विदेश सेवा के लिये चुनाव एक विशेष परीक्षा व साक्षात्कार द्वारा किया जाता है। चुनाव हो जाने के पश्चात इन्हें एक विशेष प्रशिक्षण के लिये भेजा जाता है, जो कई भागों में पूरा होता है। इसमें शैक्षणिक विषयों का ज्ञान, विदेश भाषा की शिक्षा, एक माह के लिये विदेश दूतावास में व्यापार की शिक्षा और राष्ट्रमण्डल के विदेश सेवा अधिकारी प्रशिक्षण केन्द्र में डेढ़ माह का प्रशिक्षण दिया जाता है। तत्पश्चात ही इनकी किसी विदेश दूतावास में नियुक्ति होती है। इस प्रकार प्रशिक्षित व्यावसायिक राजदूतों के अलावा सरकार समय-समय पर गैर-व्यावसायिक राजनीतिज्ञों, सैनिकों, खिलाड़ियों आदि को भी राजदूत नियुक्त करती है। दूतावास में अताशों की भी नियुक्ति की जाती है। प्रधानमन्त्री कभी-कभी विशेष परिस्थितियों में अपने व्यक्तिगत प्रतिनिधि विशेष दूत अथवा घूमने वाले राजदूत (Roving Ambassador) को भी भेज सकता है। विदेश सेवा बोर्ड राजनयिक, व्यापारी एवं वाणिज्य ओर दूतावासों में अधिकारियों की नियुक्ति, उनका स्थानान्तरण और पदोन्नति के कार्य करता है।

संयुक्त सिविल सेवा परीक्षा के माध्यम से भारतीय विदेश सेवा में चयन के उपरांत नव नियुक्तों को बहुमुखी और विस्तृत प्रशिक्षण दिया जाता है जिसका उद्देश्य उन्हें राजनयिक ज्ञान, राजनयिक गुण-विशेषताएं और कौशल प्रदान करना है। परिवीक्षार्थी अन्य अखिल भारतीय सेवाओं के अपने सहयोगियों के साथ 'लाल बहादूर शास्त्री नॅशनल अकॅडमी ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन', मसूरी में अपना प्रशिक्षण आरंभ करते हैं। उसके पश्चात परिवीक्षार्थी नई दिल्ली स्थित विदेश सेवा संस्थान में उन विभिन्न विषयों में प्रशिक्षण प्राप्त करते हैं जिसकी जानकारी एक वृत्तिक राजनयिक को होनी आवश्यक है। विदेश सेवा संस्थान के पाठ्यक्रम में व्याख्यान, सरकार के विभिन्न स्कंधों के साथ कार्य में लगाना और देश के भीतर और विदेश दोनों में सुपरिचयन यात्राएं शामिल हैं। इस पाठ्यक्रम का उद्देश्य राजनयिक रंगरूटों को इतिहास की बारीकियों, राजनय के ज्ञान और अंतर्राष्ट्रीय संबंधों से अवगत कराना और सामान्य आर्थिक और राजनीतिक सिद्धांतों का बोध कराना है। प्रशिक्षण कार्यक्रम के संपन्न होने पर अधिकारी को उसकी अनिवार्य विदेशी भाषा आबंटित की जाती है। विदेश मंत्रालय में डेस्क अटैचमेंट की अल्प अवधि के उपरांत अधिकारी को ऐसे देश में स्थित भारतीय मिशन में नियुक्त किया जाता है जहाँ उसे आबंटित अनिवार्य विदेशी भाषा उस देश की स्थानीय भाषा हो और उसका दाखिला भाषा पाठ्यक्रम में कराया जाता है। उस अधिकारी से अपेक्षा की जाती है कि वह आबंटित अनिवार्य विदेशी भाषा में दक्षता हासिल करेगा और सेवा में स्थायी होने से पूर्व आवश्यक परीक्षा उत्तीर्ण करेगा ।

हाल के वर्षों में भारतीय विदेश सेवा में प्रतिवर्ष औसतन ८ से १५ अधिकारी नियुक्त किए गए हैं। इस सेवा संवर्ग में इस समय ६00 अधिकारी हैं जो लगभग १६२ भारतीय मिशनों और विदेशों में स्थित पदों तथा देश में स्थित मन्त्रालय में विभिन्न पदों पर कार्य कर रहे हैं । विदेश सेवा अधिकारी, विदेश में अपनी सेवा, तृतीय सचिव के तौर पर आरंभ करता है और सेवा में स्थायी होते ही द्वितीय सचिव के पद पर प्रोन्नत कर दिया जाता है। बाद में होने वाली प्रोन्नतियां प्रथम सचिव, काउन्सलर, मंत्रि और राजदूत/उच्चायुक्त/स्थायी प्रतिनिधि के स्तर की होती हैं। अधिकारियों को विदेश स्थित भारतीय कौंसलावासों में भी नियुक्त किया जा सकता है जहाँ पद क्रम (बढ़ता हुआ) उप-कौंसुल, कौंसुल और प्रधान कौंसुल है। विदेश मंत्रालय में पद क्रम की ६ अवस्थाएं हैं : अवर सचिव, उप सचिव, निदेशक, संयुक्त सचिव, अपर सचिव और सचिव

www.fsi.mea.gov.in पर विदेश सेवा संस्थान वेबसाइट पर आपका स्वागत है।

(संदर्भ : विकीपीडिया और भारत सरकार के विदेश मंत्रालय कि वेब साईट)

केल्याने देशाटन

**महेश सोनवणे,**
पुणे

# डेस्टिनेशन नायजेरिया





अकरा वर्षांत नायजेरिया या देशाला खूप जवळून पाहिलं. तेव्हा समाजात प्रामुख्यानं दोनच वर्ग जास्त करून दिसले ते म्हणजे- अति श्रीमंत आणि अति गरीब! अति श्रीमंतांकडची संपत्ती डोळे दिपवून टाकणारी. मोठमोठे बंगले, तीन-तीन मजले फक्त पार्किंग, जगातल्या सर्व आलिशान ब्रँडेड गाड्या तैनातीला, असा सरंजाम! तर दुसरीकडे अतिशय बकाल वस्तीत राहणारे, रोजचं रोज कमावून खाणारे अतिशय हलाखीत राहणारे लोक. एवढी विषमता पाहावयास मिळाली.

मी आयुष्यात पहिल्यांदा ११ डिसेंबर १९८८ रोजी विमानात बसलो तो थेट १४ तासांच्या हवाई प्रवासासाठी! डेस्टिनेशन होतं लेगॉस, नायजेरिया. इतकं मोठं स्थित्यंतर अचानक आणि एवढ्या घाईत येईल अशी पुसटशीदेखील कल्पना नसताना मी एकटा या अनोळखी प्रवासाला निघालो होतो. त्या काळात मुंबई विमानतळावर निरोप द्यायला म्हणून सोबत आलेल्या सर्वांना अगदी शेवटपर्यंत पाहत 'बाय' करण्याची मुभा होती. मला निरोप द्यायला आलेल्या माझ्या पत्नीच्या हातातल्या पाचच महिन्यांपूर्वी जन्मलेल्या चिमुकलीकडे पाहत पाहत मी पुढे जात होतो. बायकोच्या डोळ्यांतून चाललेल्या अखंड अश्रुधारा आणि जड झालेलं माझं अंतःकरण अशा अवस्थेत विमानात बसलो होतो.

आफ्रिकेमधल्या नायजेरिया देशाच्या भूमीवर मी पाऊल ठेवलं, तेव्हा पुढील दहा-अकरा वर्षं हीच आपली कर्मभूमी असणार आहे याची जरादेखील जाणीव नव्हती. कारण मी सामान्य मध्यमवर्गीय विचारानं आपल्याला फक्त पुढील दोन वर्षंच इथे राहायचं आहे असा साधा सरळ हिशेब मनाशी बांधला होता. येण्यापूर्वी या देशाविषयी आणि इथल्या माणसांविषयी अनेक वाईट अनुभव ऐकले होते. पण ज्या कंपनीनं माझी नेमणूक केली होती, तिथल्या काही भारतीय आणि इतर अधिकाऱ्यांनी दिलेल्या भरवशावर मी जायचा निर्णय पक्का केला होता. आता तो निभावून नेणं ओघानं क्रमप्राप्त होतं. गंमत म्हणजे तो निर्णय निभावताना दोन वर्षांची सहज अकरा वर्षं कशी झाली हे कळलंदेखील नाही.





आज मागे वळून पाहताना लक्षात येतं, की जिथे आपण आपल्या आयुष्याच्या उमेदीची जास्तीत जास्त वर्षं वास्तव्य करतो, ती भूमी, ती जागा आपल्याला खूप जवळची वाटू लागते. लेगॉस एअरपोर्टवर उतरल्यानंतर सर्वत्र दिसणारी काळीकभिन्न, जाड ओठ, मोठी नाकं असलेली आफ्रिकन स्त्री-पुरुषांची गर्दी नंतर हळूहळू सवयीची होऊन गेली. तोच आपला समाज वाटायला लागला. खरंतर या भिन्न भाषक, भिन्न वर्णाच्या, भिन्न चालीरीती आणि संस्कृती असलेल्या लोकांशी मिळून मिसळून जाताना मला तसे काही फार वेगळे प्रयत्न करावे लागले नाहीत. मुळात माझा स्वभाव हा नवं काही जाणून घेण्यासाठी खूप उत्सुक आणि अधीर असल्यानं त्या लोकांशी माझी लवकर मैत्री झाली. आपल्याकडे दुसऱ्याला सांगण्यासाठी त्याला माहीत नसलेलं वेगळं काही असलं, की ते सांगताना आपण आणि तो दोघंही खूप उत्साही असतो. नेमकं हेच मी त्या लोकांच्या बाबतीत आणि त्यांनी माझ्याबाबत अनुभवलं. त्यांच्याविषयीच्या नवनवीन गोष्टी माहीत करून घेण्याची हौस आणि ते ऐकताना मीही त्यांना आपल्या भारताविषयी, मराठी संस्कृतीविषयी भरभरून सांगायचो. ते ऐकताना त्यांच्या चेहऱ्यावरचे वेगळे भाव टिपताना मजा यायची.

नायजेरियात आपण भारतीय हे बऱ्याच वर्षांपासून वरचढ पण भक्कम पाय रोवून असल्यानं तिथल्या उच्चभ्रू समाजात आपली गणना होते. आपल्याकडे असलेलं ज्ञान, कौशल्य, नवनवीन कल्पना, कोणत्याही संकटाला सामोरं जाण्याची ताकद, धाडसी वृत्ती, कष्टाळूपणा, आपल्यातली सेल्समनशिप, व्यवसायकौशल्य या सगळ्याची इथल्या लोकांवर अदृश्य मोहिनी आहे. त्यामुळे बाहेर कुठेही गेलो, तरी आपल्याला आदरानं 'ओगा' किंवा 'ओईबो' अशी उपाधी देऊनच संभाषण सुरू होतं. याचा अर्थ सोप्या भाषेत 'साहेब' किंवा 'परदेशी पाहुणे' असा होतो. मार्केटमध्ये फिरताना लहानसहान मुलं आणि काही आफ्रिकन बायका अंगाला हात लावून 'ओईबो, हॅलो, हाऊ आर यू?' म्हणत आपलं स्वागत करत असत. सुरुवातीला हा प्रकार विचित्र वाटून काही भारतीय महिला आणि मुलं घाबरून दूर जायचा प्रयत्न करत किंवा अंग चोरून चालत राहत. पण हळूहळू त्याची सवय व्हायची.

अकरा वर्षांत मी या देशाला खूप जवळून पाहिलं. तेव्हा समाजात प्रामुख्यानं दोनच वर्ग जास्त करून दिसले ते म्हणजे- अति श्रीमंत आणि अति गरीब! अति श्रीमंतांकडची संपत्ती डोळे दिपवून टाकणारी. मोठमोठे बंगले, तीन-तीन मजले फक्त पार्किंग, जगातल्या सर्व आलिशान ब्रँडेड गाड्या तैनातीला, असा सरंजाम! तर दुसरीकडे अतिशय बकाल वस्तीत राहणारे, रोजचं रोज कमावून खाणारे अतिशय हलाखीत राहणारे लोक. एवढी विषमता पाहावयास मिळाली.

'इलो', 'युरोबा' आणि 'हौसा' या प्रमुख तीन जातींमध्ये हा समाज विभागलेला. दक्षिण-पूर्वेकडच्या राज्यातल्या लोकांना 'इलो' म्हणत, तर दक्षिण-पश्चिमेकडच्या लोकांना 'युरोबा' आणि उत्तरेकडच्या लोकांना 'हौसा'. राजकारण आणि अर्थसत्ता यावर 'हौसा' लोकांचं प्राबल्य. प्रमुख धर्म दोनच, ख्रिश्चन आणि मुस्लिम. पैकी हौसा लोक मुख्यतः मुस्लिम धर्माचे. आपल्याकडे आहे तशीच या दोन धर्मांत अधूनमधून धुसफूस सुरू असते. ख्रिश्चन बहुसंख्य असलेल्या भागात, राज्यात ठिकठिकाणी चर्चेस दिसून येतात. दर रविवारी नियमानं एकदा तरी चर्चला हजेरी लावायचीच

हा शिरस्ता. रविवारी रस्त्यावर दिवसा गर्दी दिसणार ती चर्चमध्ये जाणाऱ्या किंवा परतणाऱ्या लोकांची. तर संध्याकाळपासून पार्ट्यांना ऊत आलेला असायचा. घराच्या लॉनवर, घरासमोर किंवा रस्त्याच्या मधोमध पेंडॉल टाकून पार्टी सुरू असायची. आफ्रिकन म्युझिकवर तालबद्ध नाचणारे स्त्री-पुरुष-मुलं पाहताना त्यांच्या अंगात जन्मतःच असणारी लय आणि ताल याची कल्पना यायची. 'अगबारा' नावाचा अतिशय ढगळ आणि भरपूर कापडाचा अंगरखा, विशिष्ट आकाराच्या वेगवेगळ्या टोप्या आणि उंची बूट असा पुरुषांचा पेहराव. एकतर संपूर्ण पांढरा, नाहीतर गडद रंगात चित्रविचित्र डिझाईन अशी साधारण वेषाची धाटणी असे. स्त्रियासुद्धा भरपूर आभूषणं आणि पायघोळ व रंगीबेरंगी ड्रेस घालून त्यावर एक वैशिष्ट्यपूर्ण वीतभर रुंदीचा पट्टा अशा पोशाखात पार्टीला हजर राहायच्या. पार्टीत सॉफ्ट ड्रिंक्स, मनमुराद बियर आणि 'नामा' मीट म्हणजे बैलाचं-गायीचं मांस यांची रेलचेल असते. पार्टी हा इथल्या सोशल जनजीवनाचा अविभाज्य भाग असतो. आदरातिथ्याची कुठेही संकोच नाही. स्वयंपाक आणि लाकडाचे बिछाने झोपडीत जवळ जवळ असायचे. आलेला पाहुणा म्हणजे परग्रहावरचं कुणीतरी आलंय असं कुतूहल. पण त्या वस्तीवर केवळ पाणी, तिथलं स्थानिक पीक असलेली अंगठ्याएवढी आणि अगदी बारीक परंतु प्रचंड तिखट असलेली मिरची आणि कांदा-टोमॅटो यांचाच मोजका वापर करून केलेलं फ्रेश फिश पेपे सूप मात्र अवर्णनीय. त्याची चव आजही आठवते.

नायजेरियात आमच्या संसाराचा तसा प्रारंभच होता. भारतात आपल्याला सवय असणाऱ्या बऱ्याच गोष्टींची इथे चणचण भासायची. सुपरमार्केटमध्ये मिळणारा लिमिटेड स्टॉक खरेदी करण्यासाठी भारतीयांची झुंबड उडायची आणि तीन-चार दिवसांतच वस्तू संपायच्या. प्रामुख्यानं डाळी, लोणची, पापड, कडधान्यं यांचा तुटवडा भासायचा. नॉर्थकडून आठवड्यातून एकदा या गोष्टी घेऊन काही हौसा अलाजी येत असत. पण अतिशय निकृष्ट दर्जाची धान्यं नाईलाज म्हणून विकत घ्यावी लागत. गहू आणल्यानंतर दळून पीठ घरात येईपर्यंतचा मोठा कार्यक्रम







एक अनोखी पद्धत इथे होती. आपल्याकडे आलेल्या पाहुण्यांना सर्वप्रथम एका थाळीमध्ये 'कोला' आणून देणं हा एक सन्माननीय रिवाज असतो. जंगलातल्या वडासारख्या दिसणाऱ्या एका वृक्षाची ही सुपारीएवढी छोटी छोटी फळं असतात. त्यांचं कवच फोडून फ्रेश कोला ऑफर करायचा असतो. लाल रंगाची, कधीकधी हिरव्या रंगाची ही द्विदल फळं चवीला तशी फारशी रुचकर नसतात. पण यजमानांचा मान राखण्यासाठी त्याचे दोन-तीन बाईट्स तरी घ्यावेच लागतात. अन्यथा तो अपमान समजला जातो. कुटुंब कितीही मोठं असलं, तरी प्रत्येक व्यक्तीनं पाहुण्यासमोर येऊन गुडघे टेकवून किंवा गुडघ्यात वाकून नमस्कार केलाच पाहिजे. पंगतीमध्ये पाहुण्याला सर्वोच्च स्थान असतं आणि त्यानं खायला सुरुवात केल्यानंतरच इतरांनी घास घ्यायचा असतो. 'ओईबो' पाहुणा ही तर गावासाठी पर्वणीच असते. गावातले लोक एकत्र येतात. जेम्बे, घुंगरं आणि ढोल यांच्या ठेक्यावर ट्रॅडिशनल ड्रेसमध्ये डान्सेस सादर करतात.

पोर्ट हारकोर्ट इथे राहत असताना आमच्या एका कर्मचाऱ्याच्या आमंत्रणावरून आम्ही पॅसिफिक समुद्रात आत असलेल्या एका छोट्याशा वस्तीवर बोटीमधून गेलेलो. झावळ्यांची आच्छादलेल्या वीस-पंचवीस झोपड्या आणि त्यात नैसर्गिक अवतारात राहणारी शंभर-दीडशे माणसं. लज्जारक्षणापुरतं वस्त्रआवरण, नाहीतर त्या प्रचंड उकाड्यात अंगावर कपडे म्हणजे शिक्षाच असा आविर्भाव सर्वांच्या चेहऱ्यावर! वागण्यात असायचा. आधी गहू धुणं, नंतर वाळवणं, मग निवडणं. त्यानंतर जवळपासच्या गिरणीत गेल्यावर आधी ती जाती पूर्ण उघडून घरून नेलेल्या पाण्यानं स्वच्छ धुवायची आणि मग वाळवण्यासाठी थोडे मक्याचे दाणे दळून त्यानंतर गहू दळायला टाकायचे. अर्थात हे सारं करण्यासाठी मदतनीस म्हणून घरात पूर्णवेळ काम करणारी मुलगी असल्यानं त्रास थोडा कमी व्हायचा. पण देखरेख आणि योग्य काम होतंय याची वेळोवेळी करावी लागणारी खात्री हा त्रास मागे असायचाच. नायजेरियात काही गोष्टी रस्त्यावर मिळत, त्या वैशिष्ट्यपूर्ण असायच्या. त्यातली एक म्हणजे अतिशय चवदार असे शेंगदाणे. रस्त्यावर ठिकठिकाणी बाटल्यांमध्ये भरून ठेवलेले हे चवदार शेंगदाणे प्रत्येकाच्या गाडीत, ऑफिसमध्ये आणि घरात हमखास असायचे. अजून एक चवदार पदार्थ म्हणजे 'अकारा!' शेंगदाण्याच्या मोठ्या आकाराएवढे चवळीचे दाणे भिजवून त्या पेस्टमध्ये तिथली लोकल मिरची आणि कांदे-टोमॅटे टाकून बनवलेल्या मिश्रणाची बटाट्याएवढी भजी हा एक वेगळ्याच चवीचा अप्रतिम पदार्थ. आम्ही तो घरीही करायचो.

बारीकसारीक अडचणींबरोबरच अधूनमधून कानांवर पडणाऱ्या चोऱ्या-दरोडे, अपघाताच्या बातम्या यामुळे मनावर थोडं दडपण येत असे. पण आपली जवळची माणसं आपल्याजवळ इथे नाहीत, अचानक काही विपरीत झालं तर चटकन धावून येणारे आपले स्वकीय, आप्त

इथे जवळपास नाहीत याची एक अनामिक जाणीव मनामध्ये भीती निर्माण करीत असे. पण तरीही जेव्हा जेव्हा इथल्या विविध भाषक भारतीयांबरोबर मेळावे, सण-समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम होत असत, त्या वेळी ती जाणीव थोडी निवळायची. पंजाबी, साऊथ इंडियन, गुजराथी, सिंधी अशा विविध प्रांतीय मित्रमंडळींचा खूप आधार वाटायचा. चांगली-वाईट माणसं सर्वच ठिकाणी असतात. तशी इथेही वाईट माणसं होती. भुरटे चोर, रॉबर्स यांच्याबरोबरच ड्रग्जच्या अमलाखाली असलेले मार्केटमध्ये लुटमार करणारे एरिया बॉईज यांची माहिती झाल्यावर मनावर दडपण यायचं. पण या सर्व वाईट अनुभवांमध्ये काही मजेदार किस्सेही असायचे. सूट-बूट अशा सभ्य वेषात येऊन समोरच्या सोफ्यात आरामशीर बसून हळूच कोटाच्या खिशातून पिस्तूल बाहेर काढून टी-पॉयवर ठेवत 'वी आर रॉबर्स' असं सांगत पुरेपूर पाहुणचार घेऊन तास-दीड तासानं सावकाश मालमत्ता आणि रोकड घेऊन जाणारे रॉबर्स हासुद्धा एक अनुभव होता. 'ईझी मनी' आणि धार्मिक, आध्यात्मिक शिकवणुकीचा अभाव ही या गुन्ह्यामागची कारणं होती. पण या वाईट अनुभवांच्या अगदी उलट जिवाला जीव देणारी प्रेमळ माणसंही अनुभवास आली. माझी चिमुकली प्रियंका नायजेरियात आली, तेव्हा जेमतेम वर्षाची होती. ती मोठी होईपर्यंत तिला न्हाऊ-माखू घालणारी, अतिशय प्रेमानं सांभाळणारी, तिला भरवणारी, घरातली कामं करणारी लिंडा ही तर कायम लक्षात राहिली. प्रियूचं शैशव खूप मजेत आणि आनंदात गेलं ते या अशा तिच्यावर भरभरून प्रेम करणाऱ्या नायजेरियन, युरोपियन, आफ्रिकन, चिनी अशा लोकांमुळे! त्यांचं बाळगोपाळांबरोबर खेळणं पाहून 'हे विश्वचि माझे घर' या उक्तीची प्रचीती यायची.


**आत्मज्योत प्रकाशन**
पुणे

**गगनाला गवसणी**
श्री शनिमहात्म्य जन्म-कथा
(अठरा पुराणे व उपनिषदाच्या आधारे)

**भवसागर नावाडी** (मराठी/हिंदी/इंग्रजी)
श्री अक्कलकोट स्वामी महाराजांचे परमशिष्य
श्री रामानंद बिडकर महाराज यांचे एकमेव शिष्य
श्री. रावसाहेब सहस्रबुद्धे यांचे चरित्र

**नराचा नारायण** (मराठी/हिंदी)
श्री अक्कलकोट स्वामी महाराजांचे परमशिष्य
श्री रामानंद बिडकर महाराज यांचे चरित्र

**साई सागरातील ८८ मोती** (मराठी/हिंदी)
१८७० ते १९१८ या काळात साईबाबांना भेटलेल्या भक्तांचे अप्रकाशित अनुभव!

**प्लॉट नं ६७, फ्लॅट नं. ३, गुरुसेवा अपार्टमेंट, जोग शाळेसमोर, एच.डी.एफ.सी. बँक लेन, मयुर कॉलनी, कोथरूड, पुणे-३८**

**फोन : 98223 43002 / 020 65001112**
**www.aatmajyotprakashan.com**
**aatmajyotprakashan@gmail.com**


## महेश सोनवणे

- वय : ५३ वर्षे
- नायजेरियात १९८८ ते २००० अशी अकरा वर्षं वास्तव्य
- युगांडामध्ये कंपाला इथे दोन वर्षं वास्तव्य
- व्यावसायिक इंजिनीअर. सध्या वाई इथे गरवारे वॉलरोप्समध्ये ऑपरेशन्स अधिकारी
- गाणी, लेखन, वाचन, नाटक यांची आवड आणि सादरीकरण
- नायजेरियात अकरा वर्षं महाराष्ट्र मंडळाचं सेक्रेटरीपद सांभाळलं. या कालावधीत अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचं सादरीकरण. कै. लक्ष्मण देशपांडे यांचं 'वऱ्हाड निघालंय लंडनला'चे चार प्रयोग. एक प्रयोग हिंदीमध्येही. द्विपात्री 'नटसम्राट'चाही प्रयोग.

माझ्या व्यावसायिक कामातही मला अशाच गुणी आणि प्रेमळ नायजेरियन व्यक्तींची खूप मदत झाली. यामध्ये मला गुरू मानून माझ्या परवानगीशिवाय एकही काम न करणारा जोसेफ; अंगात, डोक्यात आणि हातात भरपूर कसब असलेला कुनले आणि त्याची टीम; माझ्याबरोबर माझ्याशी निगडित असलेल्या अनेक सुख-दुःखाच्या प्रसंगांत साक्षीदार असलेला, तिथल्या वास्तव्यात लेगॉसला सात-आठ वर्षं एकाच मालकाकडे न राहण्याच्या इतर ड्रायव्हरांच्या परंपरेला गालबोट लावून शेवटपर्यंत माझ्याकडे राहिलेला प्रामाणिक ड्रायव्हर फ्रायडे; घानामधून आलेला ओमोलू आणि त्याच्या साथीदारांची टीम या आणि अशा अनेक सहृद माणसांची यादी मोठी आहे. फॅक्टरीत काम करताना या मंडळींनी मला कधीही मी बाहेरच्या देशातून आलेला परका बॉस आहे हे जाणवू दिलं नाही. ते माझे आणि मी त्यांचा हितचिंतक या नात्यानंच एकमेकांशी आम्ही वागलो. कुणाच्याही अडचणीच्या वेळी मदत करणं, त्याला आधार देणं यामुळे मी त्यांना नेहमी आधार वाटायचो. काही लोकांनी फसवलंदेखील, पण त्याची रुखरुख कधी वाटली नाही. माझी पत्नी संगीता हिला ड्रायव्हिंग अगदी शांततेत, सुलभरीत्या शिकवण्याचं सर्व श्रेय माझा ड्रायव्हर फ्रायडेला जातं. त्याच्याबरोबर एकटीनं किंवा प्रियंका आणि इतर मैत्रिणींसोबत जाताना कुणालाही कधी संकोच किंवा भीती वाटली नाही, उलट आधारच वाटला. सोसाट्याचा वारा, मुसळधार पाऊस, पाण्यानं तुडुंब भरलेले रस्ते आणि रस्त्यात संधी शोधणारे भुरटे चोर या सर्वांच्या कचाट्यातून आम्हाला सुखरूप घरी पोचवणारा फ्रायडेच होता. गाडीच्या डिकीमध्ये कंपनीची मोठी कॅश असताना रस्त्यात बंद पडलेली गाडी धीरानं आणि चिकाटीनं कशीबशी चालवत सुरक्षितपणे पोचवणाराही फ्रायडेच होता. हे असे थरारक अनुभव येऊनसुद्धा निभावून गेलो तो या अशाच विश्वासू लोकांमुळे! माझी अकरा वर्षं सुसह्य केली ती या अशाच लोकांनी.

खूप अनुभव आहेत. डोक्यात आठवणींची गर्दी आहे. डोळ्यांत कृतज्ञता आहे. पण नायजेरियाला माझ्या भावनिक आयुष्यात एक महत्त्वाचं स्थान आहे, हे मात्र नक्की! 'केल्याने देशाटन, होई समृद्ध जीवन' याची तंतोतंत प्रचीती या अकरा वर्षांनी दिली. या देशाचा, तिथल्या लोकांचा मी मनापासून आभारी आहे.

mps2662@yahoo.com

# पांथस्थ

## एका वेगळ्या दृष्टिकोनातून

संदर्भ : ताओ उपनिषदातील 'ताओ'चा अर्थ

अनुवाद : **श्री. ब्रिजमोहन हेडा**

ताओ हा फार आगळावेगळा अर्थगर्भ शब्द आहे. त्याच्या अर्थावर थोडा दृष्टिक्षेप टाकला, तर आपल्याला पुढे जायला मदत होईल. गोष्ट जितकी अधिक गंभीर असेल तितके तिच्यात अर्थाचे विविध पैलू समाविष्ट असतात. आणि जेव्हा एखादी गोष्ट विविधार्थी, विविध स्तरामवरील अर्थच्छटा व्यक्त करणारी असते, तेव्हा स्वाभाविकपणेच त्यात सुबोधता, सोपेपणा राहत नाही. ताओचा एक अर्थ आहे पथ, मार्ग. परंतु सगळेच मार्ग बंदिस्त असतात. पक्षी आकाशातून उडताना मार्ग तयार होतो खरा; परंतु तो बंदिस्त, चाकोरीबद्ध मार्ग नसतो. ताओ तसा मार्ग आहे. प्रत्येक वाटेवर पाऊलखुणा उमटत असतात आणि मागाहून येणाऱ्यांना त्यामुळे मार्गदर्शन होत असते. परंतु पक्षी आकाशातून उडत असताना जो मार्ग तयार होतो, त्या मार्गावर पक्ष्यांच्या कोणत्याच पाऊलखुणा उमटत नसतात आणि यामुळे नंतरच्या पक्ष्यांना त्यांच्याकडून कोणतेही मार्गदर्शन होत नाही. ताओही तसाच मार्ग आहे. जो मार्ग चाकोरीबद्ध नाही, ज्यावर कोणाच्याही पाऊलखुणा नाहीत, जो मार्ग कोणालाही इतरांकरिता निर्माण करता येत नाही, ज्या मार्गावर केवळ आपल्यालाच आपली वाट चोखाळावी लागते. आपण चालत जातो आणि वाट तयार होत राहते, अशा मार्गाची जर आपण कल्पना करू शकलो, तर आपण ताओचीही कल्पना करू शकतो. नाही; ताओ म्हणजे मार्ग निर्माण करू शकतो. परंतु असा मार्ग तर कोठे आढळत नाही. यामुळेच ताओला मार्ग म्हणणेच उचित होईल. परंतु ताओच्या अर्थाचा अजून एक पदर आहे. आता मार्गाचा दुसरा अर्थ घेऊया. ज्याच्या मदतीने पोहोचता येईल, जो गंतव्य ठिकाणी पोहोचवेल तो मार्ग. परंतु ताओ असा मार्ग नाही. आपण जेव्हा एखाद्या वाटेने चालतो आणि आपल्या ठिकाणावर पोहोचतो, तेव्हा रस्ता, मार्ग आणि गंतव्य ठिकाण हे दोघेही जोडले गेलेले असतात. खरे सांगायचे, तर गंतव्य स्थळ हे मार्गाचे शेवटचे टोक असते आणि मार्ग ही गंतव्य स्थळाची सुरुवात असते. मार्ग आणि गंतव्य स्थळ वेगवेगळे नाहीत. मार्ग आणि गंतव्य स्थळ दोन वेगवेगळ्या गोष्टी नाहीत. या दोन्ही गोष्टी परस्परांशी जुळलेल्या आहेत. मार्गाशिवाय गंतव्य स्थळ होऊ शकत नाही आणि गंतव्य स्थळाशिवाय मार्गाला अर्थ राहत नाही. परंतु ताओ मात्र एक असा मार्ग आहे, की जो गंतव्य स्थळाशी जुळलेला नाही. जेव्हा एखादा मार्ग गंतव्य स्थळाशी जुळलेला असतो, तेव्हा प्रत्येकाला त्याच मार्गाने चालावे लागत असते आणि तसे केले, तरच आपण गंतव्य स्थळी पोहोचू शकतो.

*ताओ मधील कवितांचा मुक्त अनुवाद*

## ...मार्ग

मार्ग इतका विशाल आहे की तुम्ही जेव्हा तो पाहता,
तेव्हा काही ना काही भाग दिसतच नाही
तो असतो वहिवाटीतील आणि तरीही नसतो गजबजलेला
आणि असतो तो एखाद्या खोल विवरासारखा.

वाटतो तो गूढ पूर्वजांसारखा.
करतो तो धार बोथट, सोडवतो तिढे,
उजळतो दिवे,
संपवतो गोंधळ.
अथांग तळं,
नाही कधी आटत,
कोणत्या निर्झरापासून झाले ते तयार
नाही कल्पना मला. जणू ते आहे प्रास्ताविक देवाचे.
...निर्हेतुकपणे
निसर्ग करीत असतो काम निर्हेतुकपणे,
यामुळे म्हणता येत नाही
करत असतो तो काम
कोणाच्या तरी हिताकरिता.
या अर्थाने हा मार्गही तसाच आहे,
आणि खरे सांगायचे तर असेही म्हणता येईल, की
निसर्ग या मार्गाच्या नियमांचेच अनुसरण करत असतो.
यामुळे केव्हा केव्हा ऋषी कोणाच्या हिताकरिता
काम करीत असल्यासारखा दिसत असला, तरी
तरी तो तसे काही करीत नसतो.
यामुळे जाणीवपूर्वक केलेल्या अशा प्रकारच्या कामातही
तो असतो न-नैतिक आणि तटस्थ.
कृतीतून तर सोडाच, पण
वाणी वा विचारातूनसुद्धा ऋषी होत नसतो अस्वस्थ कधी
अभंग असते त्याची निश्चल शांतता,
त्याच्या कृती असतात जशा उत्स्फूर्त
तसेच असते त्याचे वर्तनही.
या अर्थाने नसते त्याला कोणतीही आकांक्षा
व राहते त्याची शक्ती अक्षुण्ण.

**(श्री. ब्रिजमोहन हेडा, सध्या वास्तव्य सॅनहोजे, अमेरिका. जन्म १९३६, अमरावती. केशरबाई महाविद्यालय, अमरावती येथे मराठीचे प्राध्यापक होते. १९९६ साली तेथूनच निवृत्त. नागपूर आणि अमरावती विद्यापीठात कलाशाखेचे माजी अधिष्ठाता. अभ्यासपूर्ण लेखन व अनेक पुस्तके प्रकाशित.)**

विश्व पांथस्थ

## FORM FOR REGISTRATION

- Name : ____________________
- Date of Birth: [ ]
- Sex: Male [ ] Female [ ]
- Marital Status: Married [ ] Unmarried [ ]
- Education: ____________________
- Profession: ____________________
- Mobile: [ ] [ ]
- Email: ____________________
- PO Box: __________ Emirate: __________
- State: ____________________
- Country of Residence: ____________________

- How long you have been staying abroad? : ____________________
- How long you are staying in this country? : ____________________
- Which is your native place in India? : City __________ State __________
- Where do you currently stay in India, when you go for vacation? :

  City __________ State __________
- If Married, are you staying with your family abroad?: Yes [ ] No [ ]
- If you are staying alone abroad, where does your family stay : ____________________
- Number of Children : Son [ ] Daughter [ ]
- Would you like to subscribe to Vishwa Panthastha Magazine? : Yes [ ] No [ ]
- Would you like to be associated with various social projects we may undertake in future? : Yes [ ] No [ ]

We thank you for your providing above authentic information.

**editor@panthastha.com**
**Mobile : +91 99702 36906**
**Email: member@panthastha.com**

You can also register on the website www.panthastha.com

Dear Non Resident Indian (NRI) Maharashtrian (NRM),

'Vishwa Panthastha', the first magazine being published in Marathi for NRI Marathi readers. This is an attempt to build database of NRM based abroad. It is estimated that there are about 2,00,000 NRMs based in UAE alone. We can not validate it until we have sufficient data with us. Once we have sufficient database, we can do proper analysis of this data, understand needs of NRI Maharashtrians, probably suggest various social projects wherever possible.This database will be useful in reaching to them and also the readers to get in touch with 'Vishwa Panthastha' team.

You can see the list of people, in this database, by visiting website www.panthastha.com, however only select fields would be displayed upon public enquiry. This form is also available on Panthastha website.

We request you to help in building this database with authentic information, as presented below in this form. You can also fill in information for your friends, family members and people you know to make it all inclusive. You may have their information with you already on various social networks, either online or offline.

We propose to remain in touch with all of you, send copies of 'Vishwa Panthastha' to subscribers and also keep you informed you about various events, developments and announcements which matter to you.

Thanks for your registration and association with us.

**editor@panthastha.com**
**Mobile: +91 9970236906**

प्रिय अनिवासी मराठी भारतीय,

'विश्व पांथस्थ' हे मासिक खास तुमच्यासाठी सुरू केले आहे. जगभरातील मराठी वाचकांसाठीचे अशा प्रकारचे हे बहुदा पहिलेच मासिक असावे. आखातात किती मराठी मंडळी आहेत, किंवा जगभर किती मराठी मंडळी वास्तव्य करीत आहेत, याचा अंदाज घेण्यासाठी आता 'विश्व पांथस्थ'तर्फे आपण सर्वांची माहिती गोळा करण्याचे ठरविले आहे. फक्त 'संयुक्त अरब अमिराती'मध्ये दोन लाख मराठी भारतीय असावेत, असा अंदाज आहे. त्यांच्या विविध गरजा आहेत, मते आहेत. 'विश्व पांथस्थ'ने हा उपक्रम त्यांच्यासाठीच सुरू केला आहे. आपली माहिती येथे भरून द्या म्हणजे आम्हाला या माहितीचे सविस्तर विश्लेषण करता येईल. रजिस्ट्रेशन केलेल्या सदस्यांची मोजकीच माहिती ु.रिपींहरीींहर.ले या वेबसाईटवर तुम्हाला बघता येईल. तुम्ही या वेबसाईटवर जाऊन तुमच्या मित्रपरिवाराचीदेखील माहिती ऑनलाईन भरू शकता. माहिती खरी व सध्याची असावी. याद्वारे मग आम्ही तुमच्याशी संपर्क करून विविध उपक्रमांबद्दल, काही आवश्यक विषयांबद्दल तुम्हाला माहिती देऊ शकतो, तसेच तुमचे मत विविध विषयांवर जाणून घेऊ शकतो. तेव्हा या उपक्रमात नक्कीच सामील व्हा व 'विश्व पांथस्थ' परिवाराचा एक सदस्य म्हणून कार्यरत व्हा. तुमच्या सहकार्यासाठी अनेक धन्यवाद!

**editor@panthastha.com**
**मोबाईल : +९१ ९९७०२३६९०६**

Vishwa Panthastha - RNI TC No. MAHBIL09799

**Lets work... together... today...**
**for a better tomorrow**

Turnaround, Strategy Consulting, Project Incubation,
Vision Mission Definition Workshops, CEO Coaching,
Market Research and Feasibility Study, Business Plan and Project Reports,
Corporate and Capital Structuring, Cash Flow and Financial Reengineering,
Due Diligence and Business Valuation, Equity and Debt Syndication,
HR Training and Talent Search, Efficiency Improvement Audits
Joint Venture, M&A and Private Equity Placements

MITCON
International

Management | Investment | Technology | Consulting

Office: 215, Al Qayada Building, Near Dubai Airport Terminal 2, Deira,
Dubai, United Arab Emirates
Tel: +971 4 236 7295 Mobile: +971 50 5876108
Email: ceo@mitcon.ae Web: www.mitcon.ae